मंगळवार, 06 सप्टेंबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 38
Title Code : MAHMAR51117

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 06 SEPTEMBER 2022 adhunikkesari.com Adhunik Kesari ● YEAR-02 ● ISSUE-38 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# उद्धव ठाकरेंना जमीन दाखवा

## मुंबईत वर्चस्व केवळ भाजपचे असावे; अमित शाह यांनी दंड थोपटले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राजकारणात सगळे काही सहन करा मात्र धोका सहन करू नका. जे धोका देतात त्यांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे. मुंबईतल्या राजकारणावर वर्चस्व केवळ भाजपचे असावे. आता वेळ आली आहे की उद्धव ठाकरेंना जागा दाखवली पाहिजे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला. अमित शाह यांच्या उपस्थितीत मुंबईत भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक पाडली. या बैठकीला संबोधित करताना अमित शाह यांनी आक्रमक भूमिका घेत मुंबई महापालिका निवडणुकीसाठी दंड थोपटले आहे.**

अमित शाह म्हणाले की, तुम्हाला माहिती असेल की उद्धव ठाकरेंनी कशाप्रकारे आपल्याशी धोका केला. राजकारणात सगळे काही सहन करा मात्र धोका सहन करू नका. जे धोका देतात त्यांना योग्य ती शिक्षा झालीच पाहिजे. यासाठी भाजपचा एक एक कार्यकर्ता मैदानात उतरला पाहिजे. वर्ष 2019 मधे पहिल्यांदा भाजपचे संपूर्ण बहुमताचे सरकार आले. असे पहिल्यांदाच झाले आहे. वर्ष 2014 मध्ये केवळ दोन जागांसाठी शिवसेनेने युती तोडली होती, असा गौप्यस्फोट शाह यांनी केला. भाजपने कधीच छोटा भाऊ-मोठा भाऊ म्हटले नाही. शिवसेनेनेच युती तोडली असल्याचे सांगत शिवसेनेने आमच्या जागा पाडून आमच्या पाठीत खंजीर खुपसला असल्याचे अमित शाह यांनी सांगितले.

महाराष्ट्रातले हिंदुविरोधी राजकारण आपल्याला संपवायचे असल्याचे सांगत शाह यांनी भाजपच्या आगामी राजकारणाची दिशा स्पष्ट केली. तुम्ही नरेंद्र मोदींच्या नावावर, देवेंद्र फडणवीसांच्या कामावर मते मागितली आणि जिंकून आले. तुम्ही जनतेचा विश्वासघात केला असल्याचे शाह यांनी सांगितले. मुंबईतल्या राजकारणावर वर्चस्व केवळ भाजपचे असावे. आता उद्धव ठाकरेंना जागा दाखवण्याची वेळ आली असल्याचे शाह यांनी सांगितले.

**मुंबई महापालिकाची ही शेवटची निवडणूक आहे आणि लढा : देवेंद्र फडणवीस**

आगामी मुंबई महापालिका निवडणूक ही आपल्यासाठी शेवटची निवडणूक आहे, असे समजून आणि लढा आवेशपूर्ण शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका निवडणुकीसाठी दंड थोपटले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, मुंबईत ओरिजनल शिवसेना आमच्यासोबत आली आहे. गणेशोत्सवात सगळीकडे भाजपचाच बोलबाला आहे. या भरवशावर शिवसेना राजकारण करत असते आपण त्यांना मागे टाकू. आपल्या जीवनातील ही शेवटली निवडणूक आहे असे माना आणि अभी नही तो कभी नही असे ठरवा. आता केवळ एकच लक्ष्य-मुंबई महानगरपालिका असल्याचे आवाहन फडणवीसांनी केले. आपले 'मिशन मुंबई' साठी सर्व पदाधिकरी नगरसेवक भाजपा कार्यकर्त्यांचे महत्वाची भूमिका आहे. आता सर्वांनी तयारी जोरदार करायची असेही फडणवीसांनी म्हटले.

### ते काय जमीन दाखवणार, आम्हीच जमीन दाखवू : खैरे

ते काय जमीन दाखवणार, आम्हीच जमीन दाखवू असा पलटवार शिवसेनेने केला आहे. शिवसेनेचे नेते चंद्रकांत खैरे यांनी उद्धव ठाकरेंवरील टीका सहन करणार नाही. शिवसेनाला कोणीच संपवू शकले नाही, तुम्ही नष्ट व्हाल पण शिवसेना संपणार नाही. ते काय आम्हाला जमीन दाखवणार, आम्हीच जमीन दाखवू. अमित शाह यांनीच शब्द फिरवला. शाह यांच्यासारख्या व्यक्तीने खोटे बोलणे चुकीचे असे म्हणत निशाणा साधला आहे.



केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी सोमवारी आपल्या कुटुंबियांसमवेत लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपा अध्यक्ष ॲड. आशिष शेलार, प्रदेश उपाध्यक्ष राज पुरोहित, खा.मनोज कोटक आदी यावेळी उपस्थित होते.

# २०१७ साली एनडीएसोबत जाण्याचा निर्णय मूर्खपणाचा : नितीश कुमार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काही दिवसांपूर्वी भाजपाची साथ सोडली आहे. भाजपा जेडीयूत फूट पाडण्याचा प्रयत्न करतो, असा आरोप करत नितीश कुमारांनी युती तोडली. त्यानंतर नितीश कुमारांनी राजदसमवेत सत्ता स्थापन केली. तेव्हापासून नितीश कुमार सातत्याने भाजपावर टीकास्त्र सोडत आहे. आताही त्यांनी भाजपावर हल्लाबोल केला आहे. २०१७ साली एनडीएसोबत जाण्याचा निर्णय घेतला, तो मुर्खपणाचा होता. भविष्यात भाजपाशी कोणतीही युती करणार नाही, असे नितीश कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

जनता दलच्या (युनायटेड) राष्ट्रीय परिषदेत नितीश कुमार बोलत होते. भाजपाच्या नेत्यांनी माझे ऐकले नाही. मात्र, नाईलाजास्तव आम्हाला एनडीएसोबत रहावे लागले. एनडीएच्या आघाडीत असून सुद्धा जेडीयूला डावलण्यासाठी भाजपाने उपाययोजना केल्या होत्या. पण, आता विरोधी पक्षाने त्यांच्यातील मतभेद बाजूला ठेऊन एकत्र आले पाहिजे, असे आवाहन नितीश कुमार यांनी केले आहे.

**बिहारला विशेष राज्याचा दर्जा नाकारला**

पुर्वेकडील राज्यांनी विशेष दर्जा देण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली पाहिजे. जेडीयू कित्येक वर्ष एनडीएसमवेत होता. मात्र, तरीही केंद्र सरकारने बिहारला विशेष दर्जा देण्याची मागणी नाकारली, असा आरोप नितीश कुमार यांनी केला आहे. भाजपा सरकारच्या कार्यकाळात देशात 'अघोषित आणीबाणी' निर्माण झाली आहे. देशातील विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी केंद्र सरकारने तपास यंत्रणांचा दुरुपयोग केला, असा आरोप देखील जेडीयूच्या बैठकीत करण्यात आला.

**नितीश कुमार घेणार विरोधी पक्षातील नेत्यांची भेटीगाठी**

नितीश कुमार विरोधकांची एकजूट बांधण्यासाठी दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. याबाबत माहिती देताना जेडीयूचे प्रवक्ते के.सी. त्यागी यांनी म्हटले, नितीश कुमार सोमवारपासून तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. ते काँग्रेसचे नेते राहुल गांधी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते सीताराम येंच्युरी आणि विरोधी पक्षांच्या काही नेत्यांच्या भेटीगाठी करण्याची शक्यता आहे.

# हेमंत सोरेन यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला

आधुनिक केसरी न्यूज

**रांची :** झारखंडमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात राजकीय उलथापालट झाली आहे. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची आमदारकी धोक्यात आली होती. या राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर सोरेन यांनी आज विधानसभेचे विषेश अधिवेशन बोलावले होते. अधिवेशनादरम्यान मांडण्यात आलेला विश्वासदर्शक ठराव हेमंत सोरेन यांनी जिंकला आहे. सभागृहात पहिल्यांदा आवाजी मतदानाने विश्वासदर्शक ठराव मंजूर करण्यात आला. सरकारच्या बाजूने ४८ मते पडली तर विरोधात एकही मत पडले नाही. विरोधी पक्ष भाजपाने मतदानावर बहिष्कार टाकला.

झारखंडमधील सत्ताधारी यूपीए आघाडीचे सुमारे ३० आमदार रायपूरला गेले होते. सोमवारी विधानसभेच्या विशेष अधिवेशनात सहभागी होण्यासाठी रविवारी दुपारी रांचीला परतले. या आमदारांना ३० ऑगस्टपासून रायपूरजवळील एका रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले होते. या सर्व आमदारांबरोबर काल संध्याकाळी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी विश्वास ठरावाबाबत चर्चाही केली होती.

**भाजपाचे 'वॉक आऊट'**

भाजपकडूनही रविवारी सायंकाळी आमदारांची बैठक बोलवण्यात



आली होती. या बैठकीत आजच्या विशेष अधिवेशनासंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच भाजपच्या सर्व आमदारांना अधिवेशनात सक्तीने सहभागी होण्याचे निर्देशही देण्यात आले होते. विरोधी पक्षनेते बाबूलाल मरांडी यांनीसुद्धा भाजपाची रणनीती ठरविण्यासाठी आज सकाळी नऊच्या सुमारास बैठक घेतली होती. मात्र, एवढ्या प्रयत्नानंतरही भाजपाला 'वॉक आऊट' करावे लागल्याचे दिसून येत आहे.

**हेमंत सोरेन यांचा भाजपावर निशाणा**

विश्वासदर्शक ठरावापूर्वी करण्यात आलेल्या सभागृहातील भाषणात सोरेन यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. मी प्रत्येकावर भाष्य करत बसलो तर, हे अधिवेशनही कमी पडेल असे ते म्हणाले. या राज्यातील जनता जागी झाली आहे. त्यामुळे आम्हाला धमकावून चालणार नाही. देशाचे पंतप्रधानच जर देशातील राज्यांसोबत भांडत असतील तर, देशाचा विकास कसा होणार, असा सवाल उपस्थित करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. आम्ही लोक कपडे, रेशन, किराणा सामान खरेदी करत असल्याचे ऐकले आहे. पण फक्त भाजपच आमदार खरेदी करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

# विदर्भात अतिवृष्टी व नापिकीमुळे १६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

## चालू वर्षात एक हजार ३२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या; शेतकरी मिशनने सरकारला दिला "पंचसूत्री कार्यक्रम”

आधुनिक केसरी न्यूज


राहुल वासनिक

यवतमाळ : विदर्भात मागील सात दिवसात १६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहे. विशेष म्हणजे यवतमाळ जिल्ह्याच्या मारेगाव तालुक्यात ४८ तासात ६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहे. वसंतराव शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष किशोरभाऊ तिवारी यांनी मारेगाव तालुक्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी भेट देऊन सात्वन केले. दरम्यान शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शेती स्वावलंबन मिशन ने पंचसुत्री कार्यक्रम तयार केला असून हा कार्यक्रम तातडीने राबविण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे केली आहे. किशोर तिवारी यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संपुर्ण माहिती गोळा केली असून सरकारला सादर केली आहे. यामध्ये १. संतोष चव्हाण रा. चिल्ली ता. महागाव जिल्हा यवतमाळ २. गजानन जाधव रा. आजनगाव ता.आर्वी जिल्हा वर्धा ३. जियालाल राऊत रा. पारडी ता. लाखांदूर जिल्हा गोंदीया ४. अजय टोपे रा.मलंपाडी ता. एटापल्ली जिल्हा गडचिरोली ५. गिरधारी भेंडारकार रा. ता.सडकर्जूनी जिल्हा भंडारा ६. अनिल ठाकरे रा. लाकठू ता.धारणी जिलखा अमरावती ७. विनायक दुधे रा. ता. नेर जिल्हा यवतमाळ ८. शिवदास वानखेडे रा. उडखेड ता.मोर्शी जिल्हा अमरावती ९. विजय रोखडे रा.नवेगाव पेट ता.चिमूर जिल्हा चंद्रपूर १०. प्रल्हाद दमाहे रा.नवेगाव ता.व जिल्हा गोंदिया, या शेतकऱ्यांच्या आत्महत्या समोर आली आहेत ११. पुंडलीक रुयारकर रा. गदाजी बोरी तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ १२ सतीश वासुदेव बोथले रा म्हैस दोड़का तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ १३. गजानन नारायण मुसळे रा. नरसाला तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ १४. सचिन सुभाष बोढेकर रा. रामेश्वर तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ १५. हरिदास सूर्यभान टोनपे शिवणी धोबे तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ १६. तोताराम अंगत चिचुलकर रा. दांडगांव तालुका मारेगाव जिल्हा यवतमाळ यांचा समावेश आहे.

विदर्भात पहिल्या आठ महिन्यात विक्रमी १०३२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहे. यावर्षी आजपर्यंत सर्वात जास्त आत्महत्या २००६ मध्ये १२३१ झाल्या होत्या. सन २०२२ मध्ये अशाच आत्महत्या होत राहिल्या तर हा आकडा १५०० च्यावर जाण्याची भीती सुध्दा व्यक्त केली जात आहे. या आत्महत्यांना सततची अतिवृष्टी, नापिकी, उत्पादनात झालेली घट व प्रशासकीय धोरण, उदासीनता, प्रचंड भ्रष्टाचार कारणीभुत असल्याचे किशोर तिवारी यांचे म्हणणे आहे. आपण २ सप्टेंबरला यवतमाळ जिल्ह्याच्या मारेगाव तालुक्यात म्हैसदोडका, नरसाळा, रामेश्वर, गदाजी बोरी येथे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाना भेट दिली असता या घरापर्यंत प्रशासन, पोलीस, कृषी, ग्रामविकास, आरोग्य सारख्या विभागाच्या जिल्ह्यापासून तालुका पातळीचा एकही अधिकारी पोहचला नव्हता. तसेच दौऱ्याच्या वेळीही एकही अधिकारी उपस्थित नव्हता यावरून शेतकरी आत्महत्या विषयी अधिकारी किती उदासीन आहेत हे दिसते अशी खंत किशोर तिवारी यांनी व्यक्त केली आहे. सरकारने मदत जाहीर केली मात्र एकही शेतकऱ्याला मदत मिळालेली नाही. कर्जमाफीचा लाभ सुद्धा मिळालेला नाही. अन्न, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा मिळत नसल्याच्या तक्रारी सर्वानी केल्या. गावात कृषी सहायक, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, शाळेचे शिक्षक कोणीही गावात राहत नाहीत व महिन्यातुन एक दिवस वा दोन दिवस येत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी किशोर तिवारी यांचेजवळ केल्या आहेत.

शेतकरी वाचवा कार्यक्रम

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी महाराष्ट्र शेतकरी आत्महत्या मुक्त करणार असा प्रण घोषित केल्यामुळे विदर्भातील आत्महत्या रोखण्यासाठी "पंचसुत्री एकात्मिक शेतकरी वाचवा कार्यक्रम" शेतकरी मिशनचे अध्यक्ष किशोर तिवारी यांनी सादर केला आहे. यामध्ये 1 लागवडीचा खर्च, शेतीमालाचा भाव, जमीन व पाण्याचे पुनर्जीवन, उत्पादकता, बियांचे स्वातंत्र्य २. पीक पद्धती व अन्न, डाळी तेलबीया या पिकांचे नगदी पिकांच्या ठिकाणी नियोजन व त्यासाठी अनुदान ३. सहज मुबलक पतपुरवठा धोरण ४. नुकसान भरपाई शेतकरी यांना वाचविणारी पीकविमा योजना ५. प्रशासकीय ,राजकीय, सामाजिक भ्रष्टाचाराचे ग्रामीण भागातून निर्मुलन या पाच मुद्दयांवर एकात्मिक शेतकरी वाचवा कार्यक्रम सरकारने प्रायोगिक तत्वावर सर्वात जास्त आत्महत्या होत असलेल्या अमरावती, यवतमाळ जिल्ह्यात लागू करावा अशी मागणी किशोर तिवारी केली आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## गणेशोत्सवाच्या निमित्ताने...

आधुनिक केसरी

त्यांच्या मंडपात लावलेल्या डी जे किंवा स्पीकरने बधीरत्व येईल किंवा कानाचे पडदे फाटतील असा आवाज असतो. रस्त्यावरील रहदारीला प्रचंड अडथळा या मंडळांमुळे होत असतो. सर्वसामान्यांची कोंडी होते. पण बोलणार कोण ? यामुळे आधीच वाहतुकीचा ताण पडलेल्या शहरांवरचा ताण आणखी वाढतो. यात काही मंडळी सोयीस्कर भूमिका घेतात. आपल्याच सणांना तुमचा विरोध का, वर्षातून एकदाच तर येतो. पण हे सगळे युक्तिवाद फसवे आहेत. वाढवला थोडा आवाज तर काय बिघडले ? असे म्हणणाऱ्या लोकांच्या घरासमोर जेव्हा दिवसभर आणि रात्री बारा वाजेपर्यंत डी जे वाजवला पाहिजे. त्याशिवाय त्याचा त्रास काय असतो ते त्यांना कळणार नाही. वर्षातून एकदा गणेशोत्सव, एकदा नवरात्र, एकदा दहीहंडी, एकदा ३१ डिसेंबर, एकदा दिवाळी असे



एक एक दिवसाचे निमित्त करून अनेक दिवस सर्वसामान्यांना वेठीस धरले जाते. माझा उत्सवांना विरोध नाही. उत्सव तर साजरे झालेच पाहिजेत. ते आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्यही आहे. पण शक्यतो पारंपारिक पद्धतीने, पारंपारिक वाद्यांचा वापर करून ते साजरे करता येणार नाहीत का ? त्या निमित्ताने काही चांगले प्रबोधनपर कार्यक्रम हाती घेता येणार नाहीत का ? हाकेच्या अंतरावर चार चार वेगळी गणेश मंडळे कशासाठी ? आमचे नेते, नगरसेवक इ. मंडळी याबाबतीत का नाही लोकांचे प्रबोधन करीत ? प्रबोधनाच्या ऐवजी ते लोकानुनय करण्यात धन्यता मानतात. प्रश्न अनेक आहेत. यासाठी समाजप्रबोधन होणे जरुरीचे आहे. काही व्यक्ती, काही माध्यमे तसा प्रयत्न करतातही. पण दणदणाटासमोर तो आवाज विरून गेल्यासारखा भासतो. काळानुसार आपल्या उत्सव साजरे करण्याच्या पद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. गणरायाकडे आम्हाला सद्विचार, सुबुद्धी दे अशी प्रार्थना करू या.



## आनंदी पहाट

## अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे

आधुनिक केसरी

सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते. मिळेल त्यांत समाधानी राहावे असे म्हंटले जाते, पटते का आपल्याला? जे काही मिळते त्यांत आपण खरेच समाधानी राहू शकतो का? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असे नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का? अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे? हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे.



आधुनिक केसरी

## हरिनामावीना | सुख नाही ||

अहंकारा पोटी | विनाश नांदतो ||
सर्वनाश होतो | आयुष्याचा ||१||

निंदक वंदक | दोन्हीही घातक ||
होतात जाचक | सावधान ||२||

स्वार्थी या जगाचा | खेळ असे न्यारा ||
मायेचा पसारा | ओळखावा ||३||

साधक बाधक | करूनी विचार ||
ठेवावा आचार | सर्वकाळ ||४||

संतवाणी सदा | आचरावी मना ||
हरिनामाविना | सुख नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## अध्यात्मात अहंकाराला स्थान नाही



आधुनिक केसरी

एकदा एक बाई सोवळे नेसून स्वयंपाक करीत होती. बाईचे मूल झोपून उठल्यावर, अंथरूणातच 'आई, मला घे,' म्हणून रडू लागले. आई म्हणाली, 'बाळा, मी तुला घ्यायला आतुर झाले आहे रे, पण तू कपडे तेवढे काढून ये'. परंतु मुलगा कपडे काढायला तयार होईना, आणि 'आई, आई' म्हणून रडू लागला. तेव्हा शेजारच्या बाईने येऊन मुलाचे कपडे काढले, आणि मग आईने मुलाला पोटाशी घेतले. आपलेही त्या लहान मुलाप्रमाणे झाले आहे. वासना, विकार, अहंभाव इत्यादींचे कपडे न काढताच आपण परमेश्वराला भेटायची इच्छा करतो, मग त्याची नि आपली भेट कशी होणार ? परमेश्वर मातेप्रमाणेच अत्यंत प्रेमळ आणि ममताळू आहे, त्याला आपल्याला भेटायची अतिशय इच्छा आहे; परंतु जोपर्यंत आपण आपल्या अंगावरची अपवित्र आवरणे काढून टाकीत नाही, तोपर्यंत परमेश्वर आपल्याला जवळ घेत नाही.

संत आपल्याला परमेश्वराकडे जायचा रस्ता सांगतात. त्या मार्गाने गेलो तर आपल्याला खचितच भगवंताची प्राप्ती होईल. आपण पुराणात वाचलेच असेल की, श्रीकृष्णाकडे दुर्योधन आणि अर्जुन गेले असताना, श्रीकृष्ण परमात्म्याने सांगितले की, 'ज्याला मी हवा असेन त्याला माझे सैन्य आणि इतर गोष्टी मिळणार नाहीत'. हे ऐकून, दुर्योधनाने त्याचे सर्व सैन्य मागून घेतले. अर्जुनाला खरा आनंद झाला की आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळते आहे, कारण तो हे जाणून होता की, एका परमेश्वरावाचून बाकी सर्व व्यर्थ आहे. प्राणावाचून हजारो शरीरांचा काय उपयोग ?

कोणी आपल्याला सांगतीलही की परमेश्वर साता समुद्रापलीकडे आहे, तो शेषशायी आहे. तेव्हा आपल्यासारख्या सामान्य माणसाला तो प्राप्त होणे अत्यंत कठीण आहे. परंतु संतांनी आपल्यावर फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. त्यांनी नामरूपी जादूचा दिवाच आपल्या हाती दिला आहे; त्यात सत्संगतीचे तेल घातले म्हणजे झाले. हा दिवा विझू नये म्हणून फार काळजी घ्यावी लागते. मी त्रिवार सत्य सांगतो की, नीतीने वागून जो नामात राहील त्याला नामाचे प्रेम लागल्याशिवाय राहणार नाही. नीती हा सर्वांचा पाया आहे. त्या पायाशिवाय इमारत टिकू शकणार नाही. तीन गोष्टी अत्यंत जपा : परस्त्री मातेसमान माना, परधन आणि परनिंदा विष्ठेसारखी माना, आणि कशाही परिस्थितीत नामस्मरणाला सोडू नका; तुम्हाला भगवंताचे प्रेम खात्रीने लागेल.

आजचे बोधवचन : मुखात नाम ठेवावे आणि सदाचरणाने वागून प्रपंच करावा.

**– श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# ।। कळंबचा चिंतामणी गणपती ।।


आधुनिक केसरी न्यूज

पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भात देखील गणपतीची आठ महत्त्वाची मंदिरे आहेत, ह्या श्रीगणेशाच्या मंदिरांना 'विदर्भातील अष्टविनायक' म्हटले जाते.

टेकडी गणपती, नागपूर, शमी विघ्नेश, आदासा (जिल्हा-नागपूर), अष्टदशभुज, रामटेक (जिल्हा-नागपूर), भृशुंड, मेंढा (जिल्हा-भंडारा), सर्वतोभद्र, पवनी (जिल्हा-भंडारा), सिद्धिविनायक, केळझर (जिल्हा-वर्धा), चिंतामणी , कळंब (जिल्हा-यवतमाळ), वरदविनायक, भद्रावती (जिल्हा-चंद्रपूर)

विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेले हे चिंतामणी गणपतीचे मंदिर यवतमाळ-नागपूर या राज्य महामार्गावर यवतमाळ शहरापासून सुमारे २३ कि. मी. अंतरावर असलेल्या कळंब गावात आहे. चिंतामणीचे मंदिर गावाच्या सामान्य जमिनीचे पातळी पेक्षा सुमारे ३५ फूट खोलीवर आहे. मंदिराच्या प्रवेश द्वारातून पायऱ्या उतरून खाली गेल्यावर समोर एक कुंड दिसते. या कुंडाला गणेशकुंड असे म्हणतात. यातून सुमारे दर १२ वर्षांनी आपोआप पाणी वर येते. हे कुंड गणपतीने अंकुशाच्या प्रहाराने तयार केले तर या मंदिराची स्थापना देवराज इंद्राने केली असल्याचे मानतात.

ब्रह्मदेवाने एक लावण्यवती स्त्री निर्माण केली, तिला आपली मुलगी मानले. त्याने या मुलीचे नावही ठेवले. तिच्या लावण्याने देव, दानव, मानव, यक्ष, किन्नर, गंधर्व, नाग वगैरे सगळेच मोहित झाले होते. तिचा विवाह करावा असे जेव्हा ब्रह्मदेवास वाटले तेव्हा त्याने एक पण जाहीर केला, त्यानुसार जो कोणी प्रथम पृथ्वी



प्रदक्षिणा करून येईल त्यालाच तिच्याशी विवाह करता येणार होता. पण ऐकून सारेच पृथ्वी प्रदक्षिणेसाठी निघाले. हा पण,वार्ता, आर्यवर्तातल्या महर्षी गौतम यांच्या कानावरही आला. त्यांनी प्रसूत होणाऱ्या आश्रमातील गायीस प्रदक्षिणा घालून ब्रह्मदेवाकडे शास्त्राप्रमाणे तिची मागणी केली. ब्रह्मदेवाने शास्त्राधार मान्य करून महर्षी गौतम यांना आपली कन्या प्रदान केली.

पृथ्वी प्रदक्षिणेसाठी गेलेल्या मंडळीतील देवराज इंद्र सर्वप्रथम परत आल्यावर त्याला तिच्या विवाहाची बातमी कळली. पण विवाह झाला असल्याने काही उपाय नव्हता.

तिच्या लावण्याने इंद्र घायाळ झाला होता. महर्षी गौतम आपल्या आश्रमात नाहीत असे पाहून इंद्राने गौतमाचा वेष धारण करून तिच्याशी दुराचार केला. महर्षी गौतम यांना हे कळताच त्यांनी इंद्राला महारोगी होण्याचा शाप दिला. इंद्राने महर्षी गौतम यांची क्षमा मागितल्यावर गौतम ऋषींनी गणेश षडाक्षर मंत्राचा उपदेश इंद्रास केला आणि विदर्भात करंब (कळंब) येथे जाऊन श्री चिंतामणीची तपश्चर्या करण्यास सांगितले. इंद्राच्या तपश्चर्येने श्री गणेश प्रकट झाले आणि त्यांनी आपल्या अंकुशाने एक कुंड निर्माण केले. या कुंडातील पाण्याने स्नान करून इंद्राचा रोग नाहीसा झाला. तेव्हापासून या पाण्याने पापक्षालन होते असे मानतात. स्नान झाल्यावर इंद्राने तेथेच गणेशाची स्थापना केली आणि गणेश अभिषेकासाठी स्वर्गातून गंगेला पाचारण केले आणि तिला आदेश दिला की दर १२ वर्षांनी तिने पृथ्वीवर येऊन श्री गणेशाच्या पायाला स्पर्ष करून जावे. तेव्हापासून दर १२ वर्षांनी कळंबच्या मंदिरातील कुंडातून गंगा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

वर येते आणि देवाच्या चरणांना स्पर्श करून निघून जाते. हे दृश्य पाहण्यासाठी मंदिरात लाखो लोक जमतात. मागील काळात सन १९१८, १९३३, १९४८, १९५८, १९७०, १९८३ आणि १९९५ या वर्षी मंदिरातील कुंडातून गंगा अवतरली आहे अशी माहिती समजते.

गणेश कुंडाच्या समोरच मुख्य गाभाऱ्यात श्री चिंतामणीची दक्षिणाभिमुख मूर्ती आहे. ही श्री गणेशाची जगातील एकमेव दक्षिणाभिमुख मूर्ती असल्याचे मानले जाते. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोर असलेल्या सभामंडपाची निर्मिती बालगंधर्व यांनी केली आहे. यवतमाळ येथे झालेल्या एका कार्यक्रमाची संपूर्ण मिळकत त्यांनी या कामी खर्च केली.

गणपतीचं दर्शन घेतलं की चिंतेतून मुक्ती मिळते. कुठलंही संकट आलं तर भाविक या ठिकाणी येऊन आपल्यावरचं संकट या चिंतामणीला सांगतात. त्यामुळं त्यांची संकटातून मुक्ती होते, अशी श्रद्धा इथल्या भाविकांची आहे. त्यामुळं विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्याचबरोबर इतर राज्यातूनही इथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असतात. आपणही एकदा चिंतामणीचे दर्शन अवश्य घ्यावे. त्यासोबतच ह्या भागात, लोहारा-महादेव मंदिर, ढुमणापूरला-मारूतीचे मंदिर प्रसिद्ध आहेत. खटेश्वर महाराज आश्रम जवळच आहे.जवळच्या परिसरात, किनवट तालुक्यात श्री क्षेत्र माहूर रेणुका माता मंदिर आहे.दत्तशिखर, याठिकाणी दर्शन घेवू शकतात.

# लोकमान्य टिळक गणेशोत्सवाचे प्रणेते ठरले : बिपीन नाईक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एखादे सार्वजनिक कार्य हाती घेतल्यावर त्यात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करून घेत ते कार्य पुढे न्यावे लागते, वाढवावे लागते. आपण सुरू केलेले कार्य मोठ्या प्रमाणात वाढवले तर ते नेतृत्व यशस्वी झाले असे समाज मानतो. कार्य अर्धवट टाकून गेलेल्यांना 'आरंभशूर' म्हणतात. सार्वजनिक गणपती पहिल्या वर्षी ज्यांनी बसवला त्यांच्यात टिळकांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी टिळकांनी या उत्सवाचे तोंड भरून कौतुक केले. दुसऱ्या वर्षी टिळकांनी बारीकसारीक गोष्टीत स्वतः लक्ष घातले, या उत्सवासाठी मेहनत घेणाऱ्यांची 'केसरी'तून जाहीर पाठ थोपटली, जिथे काही कमी-जास्त झाल्यासारखे वाटले त्यांचे कानही धरले. तिसऱ्या वर्षी तर टिळकांनी उत्सवाची सगळी सूत्रे स्वतःच्या हाती घेतली. टिळक गणेशोत्सवाचे प्रणेते ठरले असल्याचे मत मनसेचे महानगर अध्यक्ष, बिपीन नाईक यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या औरंगाबादेतील विभागीय कार्यालयात सोमवारी त्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. या वेळी त्यांनी पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.

पुढे बोलताना मनसेचे महानगर अध्यक्ष बिपीन नाईक म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सवाबद्दल चर्चा करताना आतापर्यंत बऱ्याच ऐतिहासिक घटनांचा वेध आपण घेतला. अगदी पेशवाईच्या काळात साजरा होणारा दरबारी थाटाचा गणेशोत्सव, त्यानंतर



ब्रिटिश राजवटीमुळे गणेशोत्सवाचे बदलत गेलेले स्वरूप आणि १८९० नंतरच्या काळात या गणेशोत्सवाचे सार्वजनिकरीत्या झालेले पुनरुज्जीवन! १८९३ साली साजरा केल्या गेलेल्या गणेशोत्सवाची प्रेरणा ग्वाल्हेरच्या दरबारात साजरा होणाऱ्या गणपतीच्या उत्सवापासून नानासाहेब खाजगीवाले यांनी घेतली आणि इकडे तशाच पद्धतीचा उत्सव सुरू करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना गळ घातली. यातूनच भाऊ रंगारींच्या घरी सभा भरली आणि सार्वजनिक स्तरावर गणपती बसवण्याचे नक्की होऊन तसा तो उत्सव साजरा झालाही. लोकमान्य टिळकांनी जरी आपला स्वतःचा सार्वजनिक स्वरूपाचा गणपती १८९४ साली विंचूरकर यांच्या वाड्यात बसवला असला तरी त्यापूर्वीच पुण्यात नानासाहेब खाजगीवाले, गणपतराव घोटवडेकर आणि भाऊ रंगारी यांनी १८९३ साली गणपती बसवला होता, याचे संदर्भ पूर्वी सांगितले आहेत. गणपतीच्या मिरवणुकीला आलेले वेगळेपण खुद्द लोकमान्य टिळक मान्य करतात, तर मग आम्ही तरी त्यावर वाद कशाला घालावा? टिळकांनी त्यावर लेखनही केले आहे, त्यामुळे टिळकांच्याही पूर्वी पुण्यात सार्वजनिक गणपती बसवला जाऊ लागला होता हे मान्य करायलाच हवे. टिळकांच्या पूर्वी पुण्यात सार्वजनिकरित्या गणपती बसवला जात असे हे मान्य केले तरी, त्याचे स्वरूप नेमके कसे होते? पुढे स्वातंत्र्य चळवळीला चालना देण्यासाठी टिळकांनी या उत्सवाचा जसा साधन म्हणून वापर करून घेतला तसा काही हेतू या उत्सवकर्त्यांचा होता का, या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे, असे ते शेवटी बोलताना म्हणाले.

यावेळी मनसेचे उपजिल्हाध्यक्ष प्रशांत दहिवाळकर, शहर सचिव राहूल पाटील, राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, उपाध्यक्ष छब्बुराव ताके, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, ज्ञानेश्वर तांबे पाटील, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, डॉ. गणेश वाघ, सतिश पाटील, अनिल कुलथे आदींची उपस्थिती होती.

### आजच्या आरतीचे मान्यवर



**श्री गणेशाची मंगळवार दि. ६ रोजीची सायंकाळची आरती वैजापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्या हस्ते होणार आहे, तरी पत्रकार बांधवांनी या आरतीच्या पावनप्रसंगी उपस्थित राहावे, अशी विनंती संघाच्या वतीने करण्यात आली आहे.**



# शिवसेनेच्या सत्कार सोहळ्यात भ्याड हल्ला करणाऱ्यावर कडक कारवाई करा

## लोणार तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकत्याच बुलडाणा जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार सोहळ्यात शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी भ्याड हल्ला केला. या भ्याड हल्ल्याचा सर्व स्तरावरून निषेध व्यक्त होत आहे. प्रशासनाने हल्ला प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्याचे व कठोर शासन करण्याचे आश्वासित केले होते. परंतु पोलिस प्रशासनाने दबावापोटी दोषींवर कडक कारवाई न करता त्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येत आहे. आज दिनांक ५/९/२०२२ रोजी दोषींवर कडक कारवाई व्हावी यासाठी शिवसेना तालुका प्रमुख संदीप मापारी व शहरप्रमुख गजानन जाधव यांच्या नेतृत्वात लोणार तहसील तहसीलदार यांना झालेल्या घटनेच्या निषेधार्थ शेकडो कार्यकर्त्यांसह निवेदन देण्यात आले.

सविस्तर उत्तर असे की, बुलढाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात जिल्ह्यातील नवनियुक्त पदअधिकाऱ्यांचा सत्कार सोहळ्यात आयोजित केला होता त्या कार्यक्रमात शिंदे गटातील काही कार्यकर्त्यांनी धुमाकूळ घातली त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी आज लोणार तालुका शिवसेनेच्या व शहर शिवसेनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी तालुकाप्रमुख संदीप मापारी,शहरप्रमुख गजानन जाधव, श्याम राऊत, असलम खान, संजय नेवरे, मनु मोरे, नंदू शिरसागर, किसन मोरे, कैलास अंभोरे, दत्ता चिपडे, समाधान इंगळे, गजानन राऊत, मंगेश मोरे, हासनभाई, लुकमान कुरेशी, श्रीकांत मदनकर, किसन इंगळे, विजय, फकीरा डेंगळे, ज्ञानेश्वर चोपडे, रामदास शिंदे, फोलाने, देवानंद जाधव व शहरातील शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# 'कवट्या'ने केला बारमध्ये गोळीबार

## गुन्हेगारी टोळीचा बारमध्ये धिंगाणा, मालकाला मागितली खंडणी

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** बारमालकाने बिल मागताच 'तु मुझे पैसे क्यु माग राहा है मुझे पहेचानता नहीं क्या हमारे को पहाचानते नही क्या' असे म्हणून धिंगाना घातला. दरमहा पाच हजार रुपये खंडणीची मागणी केली. एवढेच नव्हे तर गुन्हेगारी टोळीच्या मोरक्या 'कवट्याने' हवेत गोळीबार केला. ही घटना शहरातील छोटी गुजरी येथील एम.पी. जयस्वाल वाईन बारमध्ये शनिवारी रात्री १० वाजताच्या दरम्यान घडली. या प्रकरणी शहर पोलिसांनी काही तासातच एका आरोपीला अटक केली. तर फरार असलेल्या आरोपीच्या शोधासाठी पोलिस पथक रवाना झाले आहे.

रोहीत जाधव रा.यवतमाळ, कवट्या उर्फ अलीम शेख (30) रा तलाव फैल, नयन सौदागर (28) रा यवतमाळ, रिज्जु सयानी (27)रा.यवतमाळ, नईम खान गुलाब नदी खान उर्फ नईम टमाटर (30), शेख इमरान शेख सलीम उर्फ कांगारु (29) रा. अलकबीर नगर यवतमाळ, आदया उर्फ आदेश खैरकर (25) रा. यवतमाळ अशी बारमध्ये धुडघुस घालणाऱ्या आरोपींची नावे आहे. 3 सप्टेंबर रोजी रात्री MP जयस्वाल वाईन बार छोटी गुजरी यवतमाळ येथे आरोपी दारु पिण्या करीता बसले होते. यावेळी बारचे मॅनेजर श्याम नारायनराव धामंदे यांनी फिर्यादी प्रितेश उनेश जयस्वाल रा. इतवारा चौक छोटी गुजरी यवतमाळ यांना आरोपी नेहमीच दारू पिऊन पैसे न देता निघून जातात असे सांगितले. रात्री १० वाजताच्या सुमारास बार बंद करण्याची वेळ झाल्याने आरोपींना तुमचे बील 6000 रु. झाले आहे ते बील तुम्ही द्या असे म्हटले. यावेळी आरोपी रोहीत जाधव याने 'तु मुझे पैसे क्यु माग राहा है मुझे पहेचानता नहीं क्या' असे बोलून जयस्वाल सोबत वाद केला. रोहीत जाधव याने तु बिल के पैसे कैसे मांग रहा असे म्हणुन जयस्वाल याच्या कानाखाली मारली. त्यासोबत असलेल्या नयम सौदागर शेख इमरान शेख सलीम उर्फ कांगारु यानी तु आम्हाला पैसे का माल जाता तुला जिवाने मारून टाकतो असे म्हणुन मला जिवे मारण्याचे उद्देशाने चेहऱ्यावर चाकु उगारला असता नाकावर व तोडावर लागला. तर आदया उर्फ आदेश खैरकर याने काठीने मारले. रिक्यांनी व नईम टमाटर यानी काचेचे ग्लॉस फेकून मारले. डोक्याला लागले त्यानंतर त्यानी बार डोडफोड उर्फ शेख अलीम याने त्याचे जवळील बंदुकीतून हवेत फायर करुन तुम मुझे पहेचानते नहीं क्या असे म्हणुन पैशाची मागणी केली. दर महिन्याला 5000 रु हप्ता द्यावा लागेल नाही तर जिवाने मारण्याची धमकी दिली. जखमी प्रितेश जयस्वाल याच्यावर ब्रिटीजर हॉस्पीटल यवतमाळ येथे उपचार सुरु आहे. या प्रकरणी प्रितेश जयस्वाल याच्या तक्रारीवरुन शहर पोलिसांनी सात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला असून, आरोपी नईम खान गुलाब नदी खान उर्फ नईम टमाटर याला अटक केली. पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

# लाचखोर निरीक्षकास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील वजन व मापे कार्यालयात कार्यरत असलेल्या निरीक्षक ज्ञानेश्वर किसनराव तांदळे (४९) यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ग्राहकाकडून १० हजाराची लाच घेताना सापळा रचून रंगेहाथ पकडले. येथील गॅस एजन्सीमधील इलेक्ट्रॉनिक्स वजन काटा डिस्प्ले ताब्यात घेण्यात आला होता तो सोडविण्यासाठी सदरील निरीक्षकाने दहा हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली असता सदरील तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधिक्षक दिलीप साबळे यांनी सापळा रचून पिशोर नाका येथे पांडे स्केअर येथे निरीक्षक ज्ञानेश्वर तांदळे यास १० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडले. पुढील चौकशी कन्नड शहर पोलीस ठाण्यामध्ये सुरू आहे.

# गळा चिरून युवकाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** धारदार शस्त्राने गळा चिरून युवकाची हत्या करण्यात आली. हि घटना पुसद तालुक्यातील आमदरी घाटात घडली असून, आज सोमवारी 5 सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. गजानन बंडू ढोले (वय 19) रा. मांडवा असे मृतक युवकाचे नाव आहे. मामाच्या घरी जाण्यासाठी रविवारी 4 सप्टेंबर रोजी दुपारी घरून निघाला होता. परंतु उशीरापर्यंत मामाच्या गावी पोहोचला नाही. त्यामुळे कुटुंबियांची काळजी वाढली. त्यातच आमदरी घाटात युवकाचा मृतदेह पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मृतदेहाजवळ कॉलेजबॅग असल्यामुळे युवकाची तत्काळ ओळख पटली. मृतदेहाजवळ कोणतेही शस्त्र आढळले नाही. त्यामुळे ही हत्या घटनास्थळीच झाली का?, किंवा कोणी मृतदेह आणून टाकला का? या सह अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनेची माहिती मिळताच खंडाळा पोलिसांनी घटनास्थळ गाठले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणी साठी पाठवला. पुढील तपास सुरु आहे.

# गणेश उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** चॅम्पियन्स क्रीडा मंडळ तर्फे दरवर्षी प्रमाणे गणेश उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन दिनांक 6 सप्टेंबर रोजी चॅम्पियन्स क्रीडा मंडळ बेगमपुरा येथे करण्यात आले आहे. ही स्पर्धा वयो गट 12, 14 व वरिष्ठ मुले, मुली गटात आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजयी संघांना रोख पारितोषिक व स्मृती चिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेत वेगवेगळ्या गटात एकुण 22 संघांनी सहभाग नोंदविला आहे. ही स्पर्धा प्रकाश झोतात साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संजय डोंगरे, मंजितसिंग दरोगा, संदिप ढंगारे, प्रशांत बुरांडे, विजय पिंपळे, महेश इंगळे, सुशांत शेळके, संदिप क्षीरसागर, पंकज परदेशी, शुभम गवळी, अजय सोनवणे, अभय हजारी, प्रदीप लाटे, सागर धटिंगण आदी परिश्रम घेत आहेत.

# सोयगाव तालुक्यातील पिंपळवाडी महाल्बदा गावाचे ग्रामसेवकाला वावडे

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सर्वात शेवटचे टोक असलेले पिंपळवाडी व महाल्बदा हे गाव असून ते अतिदुर्गम आदिवासी बहुल भाग म्हाणून ओडखला जाते. औरगाबाद जिल्हा परिषदेमार्फत व राज्यशासनाच्या, केंद्रशासनाच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

मात्र हे गावे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेपासून वंचित आहे. या भागातील सर्वसामान्य जनतेला शासनाकडून काही कल्यानकारी योजनेचा काही फायदा होईल का याच आशेवर बसून आहे शासनाच्या कल्याणकारी योजनेची माहीती देण्यासाठी किमान ग्रामसेवक तरी गावात असायला पाहिजे मात्र त्या मगरगठ्ठु ग्रामसेवकाला या गावाचे कसे काय वावडे आहे? ते गावात राहत नसल्यामुळे सर्वच अलबेल दिसून येते.

या अतिदुर्गम ग्रामीण भागातील जनतेला कधी वेगवेगळ्या शासकीय योजनेचा फायदा होईल व पुर्णवेळ ग्रामसेवक उपलब्ध होईल, या अपेक्षेने शासनाकडे पाहिले जात आहे. ग्रामसेवक हा गाव आणि सरपंच यामधील विकासात्मक दुवा समजला जातो. सोयगाव पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पिंपळवाडी, महाल्बदा ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसून ग्रामसेवक अंशु भोवते हे महाशय सिल्लोड येथे राहत असून तिथूनच आपला ग्रामपंचायतची शासकीय कारभार करतात. ते फक्त कधीतरी आपडाऊन करुन ग्रामपंचायतीला हजेरी लावतात ते सिल्लोड येथून जवळपास १०० कि.मी. लांब पल्ल्याच्या ठिकाणाहून आठवड्यातून एक दिवस 'अपडाऊन' करतात. त्यामुळे गाव विकासाला 'खीळ' बसेल हे साहिजकच आहे.

हाकेच्या अंतरावर पिंपळवाडी महाल्बदा या गावाच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या देव्हारी येथील ग्रामसेवक सुरेश काळे यांनी आपली ग्रामपंचायत एकप्रकारे नंदनवनासारखी बनवली आहे. तसेच मोलखेड्यात महिला ग्रामसेविका सुरेखा पवार असून मोलखेडा,हिवरी गावला विकासाकडे नेत आहे. मात्र पिपंळवाडी, महाल्बदा हे गाव विकासापासून क़ोसोअंतर दूर असून जशेच्या तशेच दिसून येत आहे. त्यामुळे




तेथील लोक म्हणतात की,आता तुम्हीच सांगा या गावाचा विकास कसा साधणार? असा सवाल केला.याचाच अर्थ असा की, ग्रामसेवक यांनाच गावाचे वावडे असून ते पिंपळवाडी महाल्बदा या गावाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करतांना दिसत आहे. शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक गावपातळीवर काम करणारा कर्मचारी उदाःग्रामसेवक, शिक्षक,तल,अशा विविध प्रकारच्या कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक असतांना ते मात्र आपल्या सोयीच्या ठिकाणीच राहणे पसंत करत असल्याने गावाच्या विकासात्मक कामाला खिळ बसत आहे. गावात नियुक्त केल्या जाणाऱ्या ग्रामसेवकांना मुख्यालयी राहणे बंधनकारक केले आहे.मात्र ते या आदेशाला केराची टोपली समजत आहे. ग्रामसेवक हा गावात नसल्याचे या पिंपळवाडी महाल्बदा गावातील नाली सफाई, नळ योजना, पथ दिवे, धूर फवारणी, मुलांना दाखले देणे धुर फवारणी केली नाहीच. सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने मुख्यालयी राहणे बंधनकारक असल्याचा ग्रामविकास विभागाने धोरणात्मक निर्णय देखील घेतला आहे. मात्र, सदर निर्णयाची पायमल्ली होताना दिसून येत आहे. याकडे वरिष्ठांचा असलेला दुर्लक्षपणा कारणीभूत असल्याचे चित्र आहे. गावात कोणत्या समस्या आहेत, कोणती कामे करायची आहेत याची साधी कल्पना नसते कारण गावात कधी फिरकूनही पाहत नाहीत. गाव म्हटले की समस्यांचा जणू पाढाच असतो.असे प्रकार पिंपळवाडी महाल्बदा ग्रामपंचायतीमध्ये आठवडा भर तर कधी महिनाभर ग्रामसेवकांचे तोंड पाहिले नसल्याचे गावकरी सांगत आहे.याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का? असा प्रश्न मात्र आता पिंपळवाडी महाल्बदा ग्रामस्थांना पडला आहे.

# भारताच्या अपयशाची कारणे ?

आधुनिक केसरी

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील ‘अव्वल चार’ फेरीच्या सामन्यात भारताला पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. प्रथम फलंदाजी मिळाल्यावर भारताने आव्हानात्मक धावसंख्या जरूर उभारली होती. मात्र, या धावांचा बचाव करण्यात जसे भारतीय गोलंदाजांना अपयश आले, तसेच आणखीही काही मुद्दे कारणीभूत ठरले. दुबईच्या खेळपट्टीवर धावांचा पाठलाग करणे सोपे जाते, हा आजपर्यंतचा इतिहास आहे. याची जाणीव भारतालाही असावी. त्यामुळेच प्रथम फलंदाजी करण्याची संधी मिळाल्यावर त्यांनी आक्रमकतेचे धोरण स्वीकारले. मोठी धावसंख्या उभी करण्याच्या दृष्टीने धावगतीही भारताच्या फलंदाजांनी राखली होती. मात्र, या आक्रमकतेच्या नादात भारताचे फलंदाज सातत्याने बाद होत गेले. त्यामुळेच अखेरच्या १० षटकांत भारताला केवळ ८८ धावाच करता आल्या.
भारताने पहिल्या सामन्यात गोलंदाजीच्या आघाडीवर बाजी मारली होती. विशेषतः भारताच्या तिन्ही वेगवान गोलंदाजांनीच पाकिस्तानचा डाव गुंडाळला होता. मात्र, आज जसप्रित बुमरा, मोहम्मद शमी आणि दीपक चहर यांची अनुपस्थिती जाणवली. या सामन्यात अतिरिक्त वेगवान गोलंदाजाची उणीव तीव्रपणे भासली. दुखापतीमुळे आवेश खान या सामन्यात खेळू शकला नाही. त्याच्या जागी खेळण्यासाठी अन्य पर्याय उपलब्ध नव्हता. या सामन्यात काही गोलंदाज महागडे ठरत असताना बदली गोलंदाजाचा पर्यायही भारताकडे नव्हता. त्यात भुवनेश्वर कुमारने टाकलेले १९वे षटक महागडे पडले. यात १९ धावा निघाल्या. त्यामुळे सामना भारताकडून निसटला. फलंदाजाला बाहेर खेचण्याच्या नादात निर्णायक क्षणी रवी बिष्णोईकडून १८व्या षटकांत तीन चेंडू वाईड पडले. त्यात अर्षदीप सिंगने असिफ अलीचा सोपा झेलही मोक्याच्या वेळी सोडला. हा झेल सोडणे भारताला नक्कीच महागात गेले. पहिल्या सामन्यातही भारताला षटकांचा वेग राखता आला नव्हता. त्याचा फटका त्यांना बसला. पण, तो पाकिस्तानलाही बसला होता. या वेळी मात्र केवळ पाच गोलंदाज, त्यात दोन फिरकी गोलंदाज वापरूनही भारत षटकांची गती राखण्यात चार मिनिटे मागे राहिले. त्यामुळे नियमानुसार अखेरच्या षटकांत एक क्षेत्ररक्षक भारताला वर्तुळात उभा करावा लागला. प्रत्येक सामन्याच्या निकालानंतर नाणेफेकीच्या कौलची मोठी चर्चा होती. सामन्यावर परिणाम करणारा हा सर्वात मोठा घटक असतो. हा सामनाही त्याला अपवाद नाही. विशेष म्हणजे नाणेफेकीचा कौल करताना पाकिस्तानचा बाबर आझम नेमके काय म्हणाला इथपासून सुरुवात आहे. रोहितने नाणे उडवल्यावर बाबर आझम ‘टेल्स’ म्हणाला. त्याचवेळी सूत्रसंचालक रवी शास्त्री यांनी बाबर ‘हेडस’ म्हणाला आणि नाणेफेक जिंकली असे सांगितले. काही वेळ गोंधळ उडाला पण, रोहितने बाबरने नाणेफेक जिंकल्याचे सांगितले आणि चर्चा थांबली. अर्थात, नाणेफेकीचा कौलसुद्धा सामन्यात निर्णायक ठरला.

# मिटवूया गुलामीच्या खुणा



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकताच नौदलाला त्यांचा नवीन ध्वज मिळालेला आहे. या ध्वजावर आतापर्यंत सेंट जॉर्ज क्रॉस चे निशाण होते. तो क्रॉस आता हटलेला आहे. इंग्लंडचा राष्ट्रध्वजावर सुद्धा हाच क्रॉस होता तो क्रॉस आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुद्धा नौदलाच्या ध्वजावर कायम होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशामध्ये ज्या अनेकानेक सुधारणा करीत आहेत त्यामध्ये ही पण एक सुधारणा आहे. देश स्वतंत्र झाला परंतु आजही देशामध्ये इंग्रजांच्या काळातील अनेक गोष्टी सुरू आहेत. भारताला जर खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्त करायचे असेल तर इंग्रजांच्या काळातील अशा अनेक गोष्टींपासून आपल्याला मुक्त व्हावे लागेल. नौदलातील या ध्वजामध्ये स्वातंत्र्यानंतर सुद्धा अनेक बदल करण्यात आले होते. परंतु त्याच्यावरचा क्रॉस मात्र कायम होता.**



आता नौदलाचा नवीन ध्वज जो आहे त्याच्यामागे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे असे भारतीय राज्यकर्ते होते की ज्यांनी आपल्या स्वराज्याला लागून असलेला समुद्रकिनारा बघितला. त्या काळामध्ये या समुद्रकिनाऱ्यावर मुघलांचे वर्चस्व होते किंवा पोर्तुगीजांचे वर्चस्व होते किंवा इंग्रजांचे वर्चस्व होते. आमचा समुद्र परंतु या समुद्रावर फिरणारी जहाजे मात्र पोर्तुगीजांची होती, मुघलांची होती. आमच्या जहाजांना पोर्तुगाली, मुघल अटकाव करायचे व आमच्याकडून कर वसूल करायचे. छत्रपती शिवाजी महाराजांनी असा विचार केला की हा देश आमचा आहे, हे स्वराज्य आमचे आहे. हा समुद्र सुद्धा आमचा आहे. मग आमच्या समुद्रावर आम्ही मुक्त पणें फिरले पाहिजे. आम्हाला अटकाव करणारे हे पोर्तुगीज लोक कोण आहेत. आणि म्हणून त्यांनी कान्होजी आंग्रे यांच्या नेतृत्वामध्ये आपले आरमार उभे केले. आपले नौदल उभे केले. जलदुर्ग बांधले. पूर्वीच्या काळी जहाजांची निर्मिती करायची म्हणजे इंग्रजांची किंवा पोर्तुगाली लोकांची मदत घ्यावी लागायची. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी यामध्ये सुद्धा प्रगती केली व स्वतः जहाज बांधणी करायला सुरुवात केली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार उभे राहिले. समुद्रावर परकीय लोकांना मराठ्यांचा दबदबा वाटू लागला, दरारा वाटू लागला. सुरुवातीला पोर्तुगाली व इंग्रज हे मराठ्यांकडून कर वसूल करायचे परंतु ज्या वेळेला मराठ्यांनी  पोर्तुगिजांच्या, इंग्रजांच्या जहाजांना अडकवून त्यांच्याकडून कर घ्यायला सुरुवात केली त्यावेळेला मात्र मराठ्यांची सत्ता इंग्रजांनी व पोर्तुगाली लोकांनी मान्य केली. व त्यानंतर मराठ्यांचे आरमार उभे राहिले व एक प्रबळ आरमार म्हणून समोर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौदलाला ध्वज प्रदान करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या आरमाराचा उल्लेख केलेला आहे अतिशय थोड्या काळामध्ये छत्रपतींनी आपले स्वराज्य तर उभे केलेच पण आपले आरमार सुद्धा उभे केले. आज जो नौदलाला ध्वज मिळालेला आहे त्या नौदलाच्या ध्वजावर शिवाजी महाराजांच्या अष्टकोनी मुद्रेचा प्रभाव आहे. एका भारतीय राज्याचा हा गौरवच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात दाखविलेली दृष्टी ही स्वदेशी दृष्टी आहे. आय एन एस विक्रांत नावाची युद्धनौका आम्ही नौदलाला सुपूर्द केलेली आहे. ज्या जुन्या आय एन एस विक्रांत नावाच्या नौकेला नौदलातून निवृत्त करण्यात आले होते त्याच विक्रांतच्या नावाने पुन्हा ही नवीन युद्धनौका बनविण्यात आलेली आहे. याला कारण आयएनएस विक्रांत ही केवळ युद्धनौका नव्हती तरीही विजयी युद्ध नौका होती. 1971 च्या भारत पाकिस्तान युद्धामध्ये याच युद्धनौकेवरून क्षेपणास्त्र डागल्या गेली आणि त्यामुळे पाकिस्तानचा नौदलाचा पराभव झाला. अशा पद्धतीची विजयी कामगिरी करणारी आयएनएस विक्रांत या नावाची युद्ध नौका पुन्हा एकदा नौदलामध्ये सामील करून नौदलाला त्यांच्या पराक्रमाचे सतत स्मरण होत राहिले पाहिजे याची व्यवस्था नरेंद्र मोदी यांनी केलेली आहे. आपल्या या आठ वर्षाच्या काळामध्ये प्रशांत महासागरामध्ये शत्रूला वचक बसला पाहिजे यासाठी आयएनएस विक्रांत सारख्या युद्धनौकेची बांधणी मोदींनी करून दाखविलेली आहे. आणि या युद्धनौकेच समारंभ पूर्वक हस्तांतरण करताना त्यांनी नौदलाचा ध्वज सुद्धा बदलविलेला आहे. ज्या ध्वजाकडे पाहून संपूर्ण नौ दलाला अभिमानाचा गर्वाचा अनुभव येतो तो ध्वज संपूर्णपणे स्वदेशी असला पाहिजे. त्याच्या मागची प्रेरणा भारतीय असली पाहिजे. अशा पद्धतीचा विचार करणे हे नरेंद्र मोदी यांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. कुठल्याही व्यक्तीला जर राष्ट्र जीवनामध्ये प्रेरणा घ्यायची असेल तर त्याला ती प्रेरणा आपल्या इतिहासापासून आपल्या संस्कृती पासूनच मिळू शकते. या आधीच्या राज्यकर्त्यांना अशा पद्धतीची बुद्धी का होऊ नये याचे कारण म्हणजे आमचा देश, आमचा इतिहास, आमची संस्कृती यापासून आम्ही कुठलीतरी शिकवण घेतली पाहिजे, कुठलीतरी प्रेरणा घेतली पाहिजे अशा पद्धतीचा दृष्टिकोन त्यांच्याजवळ नव्हता. ते केवळ राजकीय नेते होते. परंतु त्यांच्यात सामाजिक सुधारणा, लोक जीवनातील सुधारणा राष्ट्र जीवनातील सुधारणा करण्याची दृष्टी नव्हती. मोदींचे वैशिष्ट्य म्हणजे मोदी केवळ राजनेताच नाही तर सामाजिक सुधारणा करणारे व्यक्ती सुद्धा आहेत. ध्वज म्हणजे केवळ एक कापड नाही तर हजारो सैनिकांना प्रेरणा देणारे ते प्रतीक आहे.

पानिपतच्या युद्धामध्ये ज्यावेळेस विश्वासराव भाऊ पेशवे स्वतः युद्ध करायला उतरले त्यावेळेला मराठ्यांचे निशाण जे होते त्याला जरीपटका म्हणायचे त्या निशाणाची जबाबदारी जनकोजी शिंदे या अवघ्या सोळा वर्षाच्या तरुणावर आली होती. ज्यावेळेला  कितीतरी दूर युद्ध करणारा सैनिक आपल्या निशाणाला म्हणजे ध्वजाला पाहतो त्यावेळेस त्या फडकणाऱ्या निशाणीकडे पाहून त्याला प्रेरणा मिळत असते. त्याचा पराक्रम कायम राहत असतो. ज्या वेळेला शत्रू हे निशाण पाडण्यासाठी गर्दी करू लागले त्यावेळेला याच जनकोजी शिंदेने पराक्रमाची शर्थ केली व ध्वजाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणाचे बलिदान केले. त्यामुळे ध्वज ही सामान्य गोष्ट नाही. ध्वज हे पराक्रमाचे, प्रेरणेचे प्रतीक आहे. भारतीय सैनिकांना इंग्लंडचा क्रॉस पाहून काय प्रेरणा मिळणार? आणि म्हणून भारतीय सैनिकांना प्रेरणा इंग्लंडच्या क्रॉस पासून मिळू शकणार नाही परंतु छत्रपती शिवाजी महाराजां पासून मिळू शकते. त्यामुळे आज नौदलाला भारतीय ध्वज देऊन हजारो सैनिकांना स्वदेशी प्रेरणा देण्याची व्यवस्था नरेंद्र मोदी यांनी केलेली आहे. इंग्रजांच्या काळातील अशा अनेकानेक गुलामीच्या निशाण्या आता संपूर्णपणे पुसून टाकण्याची आवश्यकता आहे व आमच्या देशाचा गौरवमय इतिहास नवीन पिढीला पुन्हा एकदा सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

# भारतीय अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकावर



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**ज्या ब्रिटिश साम्राज्याने दिडशे वर्ष भारतावर राज्य केले. गुलामगिरीची सर्व मर्यादा ओलांडून भारतीय नागरिकांना पिळून खाल्ले त्याच ब्रिटिशांची अर्थव्यवस्था भारतानंतर सहाव्या स्थानावर घसरली आहे.  स्वतंत्र भारताने ब्रिटीशांना धोबीपछाड देऊन आर्थिक प्रगती करीत पाचवा क्रमांक पटकावला आहे.  2024 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा सुसाट वाढता वेग पाहता भारतीय अर्थव्यवस्था 2024 पर्यंतच तीन नंबरची होईल असा जागतीक सर्व्हेचा अंदाज आहे. अमेरिका, चीन आणि नंतर भारत (हिंदुस्थान) असे होणार आहे. जपान, जर्मनी, रशिया, इंग्लंड हे भारताच्या नंतरच्या क्रमांकावर राहतील.**

इंग्रजांच्या मनात भारतीयांबद्दल एवढा कडवत दुराग्रह आहे की त्यांच्या देशाची अर्थव्यवस्था सांभाळायला त्यांना भारतीय वंशाचे ऋषी सुनक चालला अर्थमंत्री म्हणून. पण तोच इंग्लंडचा आता पंतप्रधान होऊ पाहतोय असे दिसताच त्यांचा भारत द्वेष जागा झाला आणि त्यांनी मतदानामध्ये ऋषीला पराभूत करण्याचा चंग बांधला. इंग्लंड जनता आणि पक्षातील बहूसंख्य सदस्य ऋषी सुनकच्या बाजूने असूनही ते केवळ मुळ भारतीय आहेत म्हणूनच त्यांना पंतप्रधानपदापासून वंचित ठेवण्याचा घाट घातला जात आहे असे वाटते.
ते बाकी  काही असो पण स्वतंत्र भारताने ब्रिटीशांना धोबीपछाड देऊन आर्थिक प्रगती करीत पाचवा क्रमांक पटकावला आहे.
2024 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेचा सुसाट वाढता वेग पाहता भारतीय अर्थव्यवस्था 2024 पर्यंतच तीन नंबरची होईल असा जागतीक सर्व्हेचा अंदाज आहे. अमेरिका, चीन आणि नंतर भारत (हिंदुस्थान) असे होणार आहे. जपान, जर्मनी, रशिया, इंग्लंड हे भारताच्या नंतरच्या क्रमांकावर राहतील.
गोर्बाचेव यांचे नुकतेच निधन झाले. त्यांनीच रशिया  साम्राज्याचे तुकडे करून युक्रेन, उझबेकिस्तान वगैरे भूभाग वेगळे केले होते. कम्युनिस्ट विचारसरणी चीन आणि रशिया येथेच फक्त रूजली, वाढली. भारतातील बिनबुडाचे कम्युनिस्ट विभागले गेले. कांही रशियाधार्जिणे आणि कांही चीन धार्जिणे झाले.
भारतात केरळ आणि प. बंगाल दिर्घकाळ डाव्यांच्या म्हणजे कम्युनिस्ट मंडळींच्या हातात होते. त्यातले मोठे राज्य प. बंगाल पण त्यांनी दहा बारा वर्षापूर्वी गमावले. आता केवळ देवभूमी केरळमध्ये ते सत्तेवर आहेत. मार्क्सवादी, लेनिनवादी, भारतीय राष्ट्रीय कम्युनिस्ट पक्ष असे विभाजन त्यांच्यात झाले.
अधिच श्रीपाद अमृत डांगे, ज्योती बसू, सोमनाथ चटर्जी, गेले शिल्लक मोजकेच होते. सिताराम येचुरी, प्रकाश कारत, वृंदा कारत असे मोजकेच आता राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत.
देवभूमीतील (केरळ) फक्त सत्तेसाठी



आणि आरएसएस विरोधात एक येतात. तिथे मुस्लिमांनी उच्छाद मांडला आहे. माता अमृतानंदमयी या एकट्या कसोशीने तीथे हिंदू रक्षणार्थ संघाचे सहकार्याने लढत आहेत.
भारततली कॉंग्रेस आणि कम्युनिस्ट तसेच वैयक्तिक घराणेशाही राबवणारे पक्ष अस्तंगत झाले तर भारत चीनला ही सर्व पातळ्यांवर आणि सर्व क्षेत्रात मात देऊन आर्थिकदृष्ट्या अत्यंत मजबूत, संपन्न, समृध्द आणि स्वच्छ बलवान होईल. त्यासाठी आणखिन एक टर्म 2024 ते 2029 नरेंद्र मोदींना द्यावीत. आणि आणखी त्यानंतरची वीस वर्षे भाजपच सत्तेत ठेवावी. म्हणजे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्न बऱ्या पैकी मीटतील.
पीओके आणि चीन गिळंकृत क्षेत्र परत भारतात येईल. नेपाळ, भूतान, तिबेट, म्यानमार म्हणजे ब्रम्हदेश, आणि श्रीलंका हे शेजारी भारताचे अंकीत राज्य बणून भरभराटीला येतील. नंतर कोणीही भारताची घडी नाही विस्कटू शकणार.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आपले गुरुजी फोटोत नको; मुलांच्या काळजात राहू द्या



प्रा. प्रशांत खामकर
संपर्क क्र. 9970423204

आधुनिक केसरी

**"शाळा आमची आहे किती छान, आम्ही रोज शाळेला जाणार; गुरुजींच्या छान-छान गोष्टी ऐकणार; आम्ही रोज शाळेला जाणार. शिकुनी- सवरूनी , लिहूनी- वाचुनी ; गुरुजींमुळे अफलातून होणार; आम्ही रोज शाळेला जाणार". खरोखरच, हाडामांसाच्या सजीव गोळ्याला व निद्रिस्त अवस्थेत असलेल्या मेंदूला जागृत करून सुसंस्कारित आदर्श नागरिक घडविण्याचे काम गुरुजी करतात. त्यामुळे आपले गुरुजी वर्गातील भिंतीवर फोटोमध्ये प्रेम करून लावण्यापेक्षा त्यांना विद्यार्थ्यांच्या मनात घट्ट बिंबवणे गरजेचे आहे. त्यासाठी शाळाबाह्य कामे बंद करून मुलांना ज्ञान देण्याचे पवित्र काम गुरुजींना प्रामाणिकपणे करू देण्याची गरज आहे.**

पूर्वीच्या काळी राजेशाही असतानाही गुरुजींचे समाजात असणारे स्थान अतिउच्च होते.
राजदरबारात सिंहासनावर बसलेला राजाही गुरु आल्यावर आसन सोडून गुरूंच्या चरणी नतमस्तक होत असे. काही महत्त्वाच्या प्रसंगावर मार्गदर्शन घेण्यासाठी राजा गुरुंकडे जात असे. ऐश्वर्य संपन्न आयुष्य जगणारे राजकुमार यांनाही जीवन जगण्याची कला शिकण्यासाठी ते ऐश्वर्य सोडून गुरूंच्या गृही ज्ञानार्जन करण्यासाठी काही वर्षे जावे लागत होते.
गुरूंचे समाजाच्या मनातील स्थान एवढ्या उंचीवर पोहोचलेले होते की, कोणताही विचार न करता आपल्या उजव्या हाताचा अंगठा गुरुदक्षिणा म्हणून द्यायलाही गुरुभक्त एकलव्य मागे हटला नाही.
कालांतराने गुरुगृही जाऊन ज्ञान घेण्याची गुरुकुल पद्धती बंद झाली. गावागावांमध्ये मंदिरात, चावडीमध्ये शाळा सुरू झाल्या. अंगात पांढरा शुभ्र सदरा, धोतर व हातात छडी असणाऱ्या गुरुजींची प्रतिमा तयार झाली. या गुरुजींची शिस्त अतिशय कडक होती. शाळा बुडविण्याची कोणत्याही विद्यार्थ्यांची हिंमत होत नसे. अभ्यास न केल्यास हातावर व पाठीवर रुळाचे फटके बसायचे. "गुरुजींनी मारले"; असे घरी सांगण्याची सोय नव्हती. सांगितल्यास गुरुजींनी फटके दिल्या व्यतिरिक्त आणखी फटके घरून बसण्याची शक्यता जास्त असे. त्यामुळे "तेरे भी चूप; मेरे भी चूप". हे तत्व मुलं काटेकोरपणे पाळत. गुरुजी गावात फिरायला निघाल्यावर गल्लीबोळात खेळणारी पोरं सैरभैर होऊन पळून जायची व घरात लपून बसायची. "छडी लागे छम-छम विद्या येई घम-घम."हे ब्रीद वाक्य त्यामुळेच निर्माण झाले. परंतु असे असतानाही गुरुजींविषयी मुलांच्या मनात असणारा आदर अतिउच्च होता. समाजाच्या मनात गुरुजींविषयी असणारी सन्मानाची जागा श्रेष्ठ स्थानीच होती. भलेही आमच्या गुरुजींना पगार कमी होता परंतु मान सन्मान अमूल्य होता.
काळ बदलत गेला तसा समाजही बदलत गेला. मंदिरात चावडीमध्ये भरणाऱ्या शाळेला नवीन इमारत प्राप्त झाली. 'मोफत शिक्षण सक्तीचे शिक्षण अधिनियम २००९'चा कायदा शासनाद्वारे पारित झाला. शाळा डिजिटल व्हायला सुरुवात झाली. शाळांमध्ये गुरुजींबरोबरच महिला शिक्षकांचीही संख्या वाढत गेली. काळाच्या ओघात शिक्षण व्यवस्थेचे चित्रही बदलून गेले. शिक्षकांना गावात पाहून दूर पळून जाणारी मुले आता शिक्षकांच्या अंगाखांद्यावर खेळू लागली. बागडू लागली. आनंददायी शिक्षणाची प्रक्रिया सुरू झाली.
बुद्धिमान हुशार व अभ्यासू शिक्षकांची भरती शिक्षण प्रक्रियेत झाली. परिणामी शिक्षण व्यवस्थेत नवनवीन प्रयोग झाले. भरमसाठ फी घेणाऱ्या खाजगी डिजिटल शाळांशी आमच्या शासकीय शाळा स्पर्धा करू लागल्या. खाजगी शाळांपेक्षाही गुणवत्तेच्या बाबतीत आमच्या शासकीय शाळा अव्वल ठरल्या.



ज्या घराण्यामध्ये शिक्षणाचा मागमूसही पोहोचला नाही त्या गरीब घरातील लेकरं शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे इंजिनिअर, डॉक्टर, वकील, कलेक्टर,आमदार, खासदार, मंत्री झाली. आमच्या ग्रामीण व शहरी भागातील शिक्षण व्यवस्थेने कात टाकली. आमच्याही शाळा डिजिटल झाल्या. आमच्याही शाळांना आयएसओ मानांकन प्राप्त झाले. परंतु हे करीत असताना आमच्या शिक्षकांनी तन-मन-धन खर्च करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचाच प्रयत्न केला. पण काळाच्या ओघात शासनाची ही ध्येय धोरणे बदलत गेली. गावातील राजकारण शाळेमध्येही दाखल झाले.शालेय शिक्षणाव्यतिरिक्त अनेक अशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांवरती टाकला गेला. कारण शासनालाही माहिती होते की, कोणतीही जबाबदारी शिक्षकांवर टाकल्यावर ते काम शंभर टक्के यशस्वीपणे पूर्ण होणार. परंतु याच अशैक्षणिक कामांची व्याप्ती वाढत गेली. त्यामध्ये आमची शिक्षण व्यवस्था भरडून निघाली. मागास,आदिवासी, वंचित समाजातील बहुजनांची लेकरं शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी धडपडणारे आमचे शिक्षक शिक्षण व्यवस्थेपासून विचलित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जणू शासकीय शिक्षण व्यवस्थाच डबघाईला आणण्याचा कुटील डाव आखला जातो की काय? अशी शंकाही मनामध्ये निर्माण होते. समाजामध्येही शिक्षकांविषयी असणारा आदर कमी होऊ लागला आहे. शिक्षकांचा अनादर करणारी वक्तव्य लोकप्रतिनिधींकडून केली जातात. प्रसार माध्यमांवर शिक्षकांचा अनादर करणारे विनोद पाठविले जातात . ज्या समाजात शिक्षकाचा अनादर होतो तो समाज रसातळाला गेल्याशिवाय राहत नाही असा इतिहास आहे.
अशी शिक्षणाविषयी प्रतिकूलता असतानाही आपल्यासमोर बसलेल्या गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या,वंचितांच्या व बहुजनांच्या लेकरांमधून उद्याच्या भारताचा आदर्श व सुसंस्कारित नागरिक घडविण्यासाठी धडपडणाऱ्या समस्त शिक्षकांना शिक्षक दिनाच्या मनापासून हार्दिक शुभेच्छा.

# शिक्षक : आव्हानांचा सामना करणारा प्रतिष्ठित पेशा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**शिक्षकांसमोर अनेक आव्हाने असून, काही आव्हाने शिक्षकांमुळे निर्माण झालेली आहेत, काही प्रशासनामुळे तर काही आव्हाने सरकारांवरील जागतिक प्रभाव-दबावांमुळे, धोरणांमुळे उभी ठाकली आहेत. शिक्षकांसमोरील आव्हानांचा गुंता वाढतच चाललाय. सरकारच्या धरसोड वृत्तीच्या धोरणांचा मोठा फटका शिक्षण आणि शिक्षकांसह विद्यार्थ्यांना बसतोय. खेडोपाडी इंग्लिश माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या. सरकारी शाळांची पटसंख्या कमी होऊ लागली. संचमान्यतेत शिक्षकांची पदे कमी होऊ लागली. यामुळे शिक्षकांमध्ये असुरक्षितता पसरली.**

वेगवेगळ्या योजना, उपक्रम याविषयी प्रशासनाकडून वारंवार डेटा मागितला जातो. दिवसेंदिवस ही 'डेटा भूक' वाढत चाललीय, कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सोयीसुविधा पुरवलेल्या नसल्यामुळे हा डेटा ऑनलाईन पुरवताना शिक्षक मेटाकुटीला आलेत. शिवाय वृक्षलागवड, योगदिन, वाचन प्रेरणा दिवस यासारख्या निरनिराळ्या प्रासंगिक उपक्रमांचे फोटो अपलोड करायचे असतात. ग्रामीण भागात सरकारी शाळांची संख्या मोठी आहे. तिकडे हे काम शिक्षकांनाच करायला लागते. 'उपक्रम ठीक, अहवाल आवर', अशी एकूण स्थिती आहे.
शालेय पोषण आहार योजना अत्यंत महत्त्वाची योजना आहे. पोषण नाही झाले तर शिक्षण कसे होणार? शिवाय या योजनेमुळे विद्यार्थ्यांची शाळेतली उपस्थिती वाढायला मदत झाल्याचे अभ्यास सांगतात. मात्र या योजनेचे जू मुख्याध्यापकांच्या खांद्यावर ठेवले आहे. ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकी शाळांची संख्या मोठी आहे. बाजारातून भाजीपाला आणणे, प्रत्यक्ष आहार शिजवणे-वाटप करणे, हिशेब ठेवणे अशी कामे मुख्याध्यापक किंवा त्या पदाचा चार्ज असलेल्या शिक्षकांनाच करायला लागतात.
सर्व आव्हाने असूनही, आपला सन्मान राखण्यासाठी संघर्षाचा सामना कसा करायचा हे शिक्षक जाणतात. हेच कारण आहे की आजही मोठ्या पदावर पोहोचलेले लोक शिक्षकांना सामोरे जाताना नतमस्तक होतात.
शिक्षक आणि शिक्षणाकडे पाहण्याचा पारंपारिक भारतीय दृष्टिकोन खूप सकारात्मक आहे. 'सा विद्या वा विमुक्तये' असेही म्हणतात. म्हणजेच ज्ञान हेच जे माणसाला मुक्त करते. ही मुक्तीची इच्छा म्हणजे जीवनातील सर्व दुर्गुणांपासून मुक्त होण्याची इच्छा. त्याच वेळी, गुरू शिक्षणाद्वारे शिष्यांच्या चेतनेमध्ये मुक्तीचा हा संस्कार तीव्र करतात.
शिक्षणाचा हा संकल्प भारतीय परंपरेत





वर्षानुवर्षे स्वीकारला गेला आणि त्यानुसार विद्यापीठे आणि गुरुकुलांमध्ये शिक्षण दिले गेले. शिक्षणाबरोबरच संस्कारही झाले आणि परिपूर्ण माणूस घडवण्याची प्रक्रिया सुरू राहिली. भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या ताकदीमुळे अनेक परकीय आक्रमकांचे आक्रमण आणि भारताच्या मोठ्या भागावर त्यांची सत्ता असतानाही भारताचा नैतिक आणि सांस्कृतिक पाया मजबूत राहिला. आक्रमणकर्ते मंदिरे आणि पुतळे तोडण्यात यशस्वी झाले, पण भारतातील लोकांच्या मनातील संस्कारांचा भक्कम किल्ला त्यांना भेदता आला नाही. ग्रंथालय जाळल्याने विद्यापीठाचे ग्रंथालय नष्ट झाले, पण गुरुमुळे ज्ञानसंपदा चिरंतन राहिली.
गुरुकुल परंपरेच्या काळात समाजात दोन प्रकारचे शिक्षक होते. एक ते ज्यांनी शिक्षणाच्या बदल्यात फी स्वीकारली आणि दुसरे ज्यांनी मोफत शिक्षण दिले. भारतीय समाजात ज्ञानदान हे सर्वात मोठे दान मानले जाते. मोफत शिक्षण दान करण्याची शपथ घेतलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाच्याही गरजा होत्या, त्यामुळे त्याला समाजात काही विशेष अधिकार मिळाले. शिष्यांबद्दल आपुलकीची भावना ठेवणे, त्यांना जीवनाच्या समग्रतेची जाणीव करून देणे ही भारतीय शिक्षण पद्धतीची मूळ ओळख होती. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या गुरूबद्दल आयुष्यभर आदर होता.
कालांतराने, जीवनाच्या गुंतागुंतीतून जात असताना, या व्यवस्थेत विकृती आली आणि लोक या विशेष सामाजिक सन्मानाचा दुरुपयोग करू लागले. स्वार्थ, द्वेष आणि निराशा प्रत्येक युगात असते. अन्यथा, आपल्या संकल्पाच्या बळावर श्रेष्ठ धनुर्धारी बनलेल्या एकलव्याकडून द्रोणाचार्य गुरुदक्षिणेत अंगठा का द्यावा लागला? मॅकॉलेच्या शिफारशींच्या आधारे ब्रिटिशांनी लागू केलेल्या शिक्षण पद्धतीमुळे देशाचे खूप नुकसान झाले. स्वातंत्र्यानंतर अशी शिक्षणपद्धती अंगीकारली गेली असती जी जीवनाची सकारात्मक जाणीव निर्माण करेल. घाईघाईत आपल्या धोरणकर्त्यांनी तीच शिक्षणपद्धती अंगीकारली. एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले असते तरी सुदैवी ठरले असते, पण नव्वदच्या दशकात बाजारवादाच्या झंझावातात सेवेला समानार्थी समजला जाणारा शिक्षण हा मोठा 'व्हाईट कॉलर' पेशा बनला. पण विविध स्तरांवर शिक्षकांच्या शोषणाला सुरुवात झाली. खासगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकांना कमी पगार मिळत असल्याच्या तक्रारी सर्रास होतात, मग सरकारी यंत्रणेतील शिक्षक जनगणना, पशुगणना यापासून माध्यान्ह भोजनाचा दर्जा राखण्याच्या जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रतिष्ठा पणाला लावत राहतात.
विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांची असते. मात्र मागील काही वर्षांपासून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या नात्यामध्ये दुरावा निर्माण होत आहे. त्यातच जिल्हा परिषद शिक्षकांना व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना विविध सामाजिक जबाबदाऱ्यांसह १०८ अशैक्षणिक कामे करावी लागतात.
मतदार याद्या तयार करणे, जनगणना, पटनोंदणी, हत्तीपाय निर्मूलनासाठी सर्वेक्षण, वृक्षारोपण, शाळेची रंगरंगोटी, विद्यार्थ्यांचे बँक खाते, आधार कार्ड काढून देणे, पालकांची सभा, शाळा व्यवस्थापन समिती सभा, शाळेची ऑनलाईन माहिती भरणे, यू डायसवर माहिती भरणे, शैक्षणिक अहवाल तयार करणे, शिष्यवृत्तीबाबत माहिती भरणे, शिक्षण विभागाने मागितलेली माहिती पुरविणे, शालेय पोषण आहार वाटपाची कामे, पोषण आहारच्या नोंदी ठेवणे, धान्यसाठा नोंदविणे, धान्य, साहित्याची मागणी, शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे, विद्यार्थ्यांना धान्य वितरण करणे, प्रत्येक राष्ट्रीय कामात मदत करणे, सध्या कोरोनामुळे रस्त्यांवरही शिक्षकांना तपासणीसाठी कामावर लावण्यात आले होते. खिचडी शिजविण्यापासून मुलांना वाटप करण्यापर्यंतची कामे करावी लागत असल्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करून केवळ विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी त्यांच्यावर देणे गरजेचे आहे.
या परिस्थितीचा शिक्षकांच्या मनोबलावर विपरीत परिणाम झाला आहे व होत आहे.
सर्व आव्हाने असूनही, आपला सन्मान राखण्यासाठी संघर्षाचा सामना कसा करायचा हे शिक्षक जाणतात. हेच कारण आहे की आजही जीवनाच्या विविध क्षेत्रात उत्तुंग उंची गाठलेली माणसे जेव्हा आपल्या शिक्षकांसमोर पोहोचतात तेव्हा ते त्यांच्यापुढे जाहीरपणे नतमस्तक होतात.

## माझे आदर्श ढासळताना

**मी पाहिलं
माझ्या आदर्शांनी
समाजास आकार देतांना
अन इथल्या मातीवर
संस्कार करतांना.**

**अन्
माझ्या गुरूंनी लेखणी हातात देवून मला
जीवन जगणे शिकवितांना.**

**मी पाहिलं
गुरुजी इतिहास शिकवीत असतांना
भूगोलास आकार देतांना.
अन पृथ्वीच्या गोलासारखी माणसे वाचण्यास
शिकवितांना.**

**मी पाहिलं
प्रत्येक गणिताबरोबर माणसे पेरणे शिकवितांना.
अन येणाऱ्या संकटांचा भागाकार करतांना.**

**मी पाहिलं
गुरुत्व आकर्षणाचा नियम शिकता शिकता हे
विश्वची माझे घर होतांना.
अन नाठाळांच्या माथी
तुकोबांची काठी हाणतांना.**

**अन्
गुरुजींनी शिकवलं
माणसातल्या माणूसपणाचा सन्मान करायला.**

**पण..
आज गुरुजी मी पाहिलं
तुमचा अपमान हा नादान समाज करतांना..
अन तुमच्या पगारावर इथे सारेच जळतांना.**

**अन्
खरं सांगतो गुरुजी
तुमचा मास्तर होतांना
लई वाईट वाटतया.**

**माझा नाइलाज आहे गुरुजी
अन्
तुम्ही होता म्हणूनच
समाजात माणूस उरला गुरुजी.**

**अन्
माणसातला देव मी
तुमच्यातच शोधला गुरुजी..**

-ज्ञानेश्वर गायके, कन्नड, जि. औरंगाबाद
संपर्क क्र. ९४०३३८४८८९

# लाज वाटते सर म्हणायला!!



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**माणसाला जगायला काय फारसे काही लागत नाही. आपणच आपल्या गरजा वाढवत जातो. मग काय अधिक गरजा, अन् त्यासाठी अधिक पैसा, अधिक भ्रष्टाचार असं दुष्ट चक्र सुरू होतं. मला या चक्रातून बाहेर पडायचं आहे. मला फक्त साधेपणानं, सुखाने जगायचे आहे. त्यासाठी या वाममार्गाने मिळवलेल्या पदवीची काही गरज नाही. मला आता समजून चुकलय.पदवीच, शिक्षणाचा, कमाईचा, श्रीमंतीचा अर्थाअर्थी काही परस्पर संबंध नसतो. आपण शिकूनही जर आपल्याला चांगल्या-वाईटाची पारख नसेल, नीती अनीतीची चाड नसेल तर काही उपयोग नाही शिक्षणाचा, अन् पदव्यांचा? सुखाने जगण्यापेक्षा सुखाने मरणं जास्त महत्वाचे. मला हेच हवे आहे यापुढे.**

गुरुदेव, मला माफ करा. यंदा गुरू पूर्णिमेला आलो नाही नमस्काराला. बरेच दिवसांपासून आतल्या आत धुमसत होतं हे वादळ. आज सगळं मोकळं करायचं ठरवलं. खरं सांगू सर, तुम्हाला सर म्हणायचीसुध्दा लाज वाटते. मलाच नव्हे, अनेकांना लाज वाटते. पण कुणी स्पष्ट बोलण्याचं धाडस नाही केलं आतापर्यंत. मी ते करतोय. कारण सहनशक्तीची देखील सीमा असते.

मला तर तुमच्या हाताखाली पीएचडी केली याचा देखील पश्चाताप होतोय. मी तर ही पदवी देखील परत करावी म्हणतोय विद्यापीठाला. ते नियमात बसतं की नाही माहित नाही. पण काय उपयोग या पदवीचा,जी कसातरी जुगाड करून मिळवली? तुमचं सगळं कामच म्यानेज केलेलं, सेट केलेलं. तुम्ही आमिष दाखवायचा विद्यार्थ्यांना... माझ्याकडे नोंदणी करा पीएच. डी. साठी! पदवी मिळालीच म्हणून समजा! अर्थात मोबदला म्हणून तुम्हाला सर्वस्वी शरण जाणे, तुमची घरची, दारची सांगाल ती कामे करणे, त्यासाठी पदरचे पैसे खर्च करणे, हे ओघाने आलेच.आम्ही सारे विद्यार्थी हळू आवाजात, आपसात बोलत असू त्यावर.पण बाहेर मोठ्यानं बोलण्याची भीती. तुमची दहशतच तशी होती.कारण विद्यापीठात दबदबा होता तुमच्या नावाचा. विद्यापीठाच्या राजकारणात तुम्ही आधी पासूनच सक्रिय होता. शिवाय विद्यार्थी संघाचा तुम्हाला पाठिंबा. मोठमोठ्या पदाधिकारी मंडळीत तुमची उठबस. वेगवेगळ्या कमिटीवर स्वतःची वर्णी लावण्यात तुम्ही चांगलेच वाकबगार. त्यासाठी वाटेल तिथे, वाटेल तशी लाचारी पत्करण्याची तयारी! कोणत्याही थराला जाण्याची तयारी. त्यामुळे तुमच्या शब्द कोषात अशक्य हा शब्दच नव्हता. सारे विद्यार्थीच नव्हे तर तुमचे सहयोगीदेखील तुम्हाला घाबरून असायचे. देवघेव केली की तुम्ही कुणाचेही काम करायला तयार. म्हणजे ज्याचे काम झाले ती व्यक्ती आपोआप मिंधी होणार, लाचार होणार तुमच्या पुढे.कुणी तुमच्या विरोधात जाण्याचा, तुमच्याशी पंगा घेण्याचा प्रयत्न केला की त्याची वाट कशी लावायची, हे तुम्हाला चांगलेच ज्ञात होते. त्यामुळे कुणीही तुमच्या वाटेला जाण्याची सहजासहजी हिंमत करत नव्हता.

तुम्हाला फक्त एकच शेराला सव्वाशेर मिळाला. त्या एका बाबतीत तुमचे सारे आखाडे चुकले. एरवी इतरांना लोळण घ्यायला लावणारे तुम्ही, त्याच्या पुढे चीतपट झाला. कॉलेजच्या प्राचार्यपदी लोकल कुणाची नियुक्ती न होता, थेट परदेशातील उत्तम संशोधन केलेल्या, बाहेरच्या पदव्या घेतलेल्या तरुण व्यक्तीची निवड झाली. ही निवड सर्वांसाठी अनपेक्षित अशी होती. तुम्हाला तर चांगलाच धक्का देणारी होती. पण कुलगुरूपुढे तुमची डाळ शिजली नाही. कारण कुलगुरूदेखील आयएएस अधिकारी... कामाच्या बाबतीत चोख, कारभार स्वच्छ. त्यामुळे तुमची गोची झाली. सुरवातीपासूनच तुमचे या प्राचार्याशी सूर जुळले नाहीत. तुम्ही कॉलेजमध्ये स्वतःचे एक कोंडाळे तयार केले होते. स्वतःच्याच विद्यार्थ्यांचे किंवा तुम्ही ज्यांना उपकृत केले अशा सहकाऱ्यांचे. सुरुवातीला या चेल्याच्या मदतीने तुम्ही नव्या प्राचार्यांना कोंडीत पकडण्याचा, घेरण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण तो गृहस्थ दहा गावचे पाणी पिऊन आलेला. शिवाय त्याच्या कामकाजात लुडबुड करण्याचा खूप प्रयत्न करून पहिला. आपली विद्यापीठात, सरकार दरबारी कशी पोच आहे हे आड वळणाने सांगण्याचा प्रयत्न केला. पण तुमची तिथे डाळ काही शिजली नाही. त्यांना तुमच्याकडून काही अपेक्षा नव्हत्या. त्याचे कुणाशीच काही देणेघेणे नव्हते. आपल्या कामाशी काम. संस्था वाढवायची कशी हा एकच ध्यास. आर्थिक व्यवहार स्वच्छ. प्रशासनात शिस्त. कुठेही चालढकल नाही. आळस किंवा दिरंगाई नाही. या शिस्तीची, तुम्हाला, तुमच्या चेल्या-चपाट्यांना सवय नव्हती. पण तुम्हीदेखील विद्यापीठाच्या राजकारणात मुरलेले होता. इकडून तिकडून या प्राचार्याला कोंडीत पकडण्याचा तुमचा प्रयत्न होता. तुमची ही हेराफेरी अनेकांना पसंत नव्हती. पण तुमचा दबदबाच असा होता की तुम्हाला काही बोलण्याची, सांगण्याची कुणाची हिंमत होत नव्हती. तुम्ही कुणाला कुठे कसे कोंडीत पकडले, कसे चीत केले याच्या कथा विद्यापीठात प्रचलित होत्या. शिवाय विद्यार्थी संघाच्या नेत्यांना हाताशी धरून तुम्ही कोणत्या स्तराला जाऊ शकता हे अनेकांनी अनुभवले होते. तुम्ही विद्यापीठात कुणालाही हाताशी धरून काहीही करू शकता अशी तुमची ख्याती होती.

तुमच्याच मुलीच्या प्रकरणात ते लोकांनी अनुभवले, पाहिले होते. ते प्रकरण तर मीडियात देखील गाजले होते.



तुमच्या मुलीचे पोस्ट ग्रॅज्युएशनच्या परीक्षेत दोन विषयांत गुण वाढवून तिला नापासचे पास करण्याची किमया तुम्ही केली होती. ज्या एका सहकाऱ्याला तुम्ही त्रास दिला होता त्यानेच एका क्लर्कला हाताशी धरून हे प्रकरण उजेडात आणले. सारे काही सूर्य प्रकाशासारखे स्वच्छ असल्याने चौकशी समिती नेमल्या गेली. साक्षी पुरावे झाले, सीसीटीवी फुटेज मध्ये सारे उघड झाले. तिला त्या परीक्षेतून बाद करण्यात आले. तिचे कायमचे नुकसान झाले. पण त्या वेळच्या कुलगुरूना हाताशी धरून, खरे म्हणजे देवघेव करून तुम्ही कशी तरी स्वतःची सुटका करून घेतली. त्यावेळी मीडिया, खास म्हणजे सोशल किंवा इलेक्ट्रॉनिक मीडिया आजच्या इतकी प्रबळ नव्हती.एरवी तुमचे देखील बारा वाजले असते. तुम्हाला तुमच्या प्रतिष्ठेची जास्त काळजी होती. मुलीपेक्षा स्वतःला वाचविण्यासाठी तुम्ही जास्त सजग होता. तेव्हा मुलगीदेखील तुमच्या विरोधात होती.तुमची पत्नी, काकू त्यांना देखील तुमचे उद्योग पसंत नव्हते. आम्ही तुमच्या घरी यायचो तेव्हा तुमच्या परोक्ष आम्हाला बोलायच्या त्या. तुमचा आर्थिक गैरव्यवहार त्या दोघींना मान्य नव्हते. पण तुमची बाहेरच नव्हे तर घरातदेखील अनभिषिक्त सत्ता होती. तुमच्या पुढे कुणाचे काही चालत नसे. तरीही पुढे तुमच्या मुलीनेच तुम्हाला धडा शिकवला. तुमच्या कारवायांमुळे गुण वाढी प्रकरणात तुमच्या मुलीचीदेखील भरपूर बदनामी झाली होती. ती तुमच्यासारखी राजकारणातील खिलाडू नव्हती. त्यामुळे तिचा भावनिक गोंधळ उडणे स्वाभाविक होते. त्याची परिणीती पुढे तिच्या घरातून पळून जाण्यात झाली. तिने स्वतःचे लग्न स्वतःच जमवले. तेव्हा तुम्हीही हादरला होता. तुम्ही काय केले, कसे केले तुमचे तुम्हीच जाणता.तुम्ही मुरब्बी राजकारणी होता. त्यामुळे ते प्रकरण मिटविण्यात तुम्ही यशस्वी झालात. तशीही मीडियाची मेमरी शॉर्ट असते असं म्हणतात. ते प्रकरण काळाच्या ओघात थंडावल.

मी पीएच.डी.ची पदवी परत करण्याचं का ठरवलं सांगू? कारण त्या संशोधनात, अभ्यासात, प्रबंधात काही तथ्य नाही हे माझ मला माहिती आहे. जेव्हा इंटरनेट, संगणक हे फारसे प्रचलित नव्हते, तेव्हा तुम्ही आम्हाला कटपेस्ट चे धडे दिलेत! शिवाय वरून तंबी, हे कुणाला सांगायचं नाही. कुठे काही बोलायचं नाही. तुमच्या जवळची पुस्तकं, आधीचे इकडतिकडचे तुमच्याकडे परिक्षणासाठी आलेले प्रबंध..असा मसाला तुम्ही आम्हाला देणार.अन् आम्ही त्या खिचडीत थोडा मसाला टाकून नवा पदार्थ तयार करणार! मग परीक्षक तुम्हीच ठरवणार, त्यांच्याशी बोलणी करणार, आम्हाला वेळोवेळी रकमा सांगणार, आम्ही त्या कशीतरी तजवीज करून तुम्हाला पुरविणार. मग तिकडे विद्यापीठात प्रत्येक सेक्शनमध्ये, प्रत्येक टेबलवर तुमचं सेटिंग! स्वतः नामानिराळे राहून याच्या त्याच्या मध्यस्थीने तुमचा व्यवहार बिनबोभाट चालायचा. या कानाची त्या कानाला खबर लागू न देता तुमचा व्यवहार चालायचा! सगळेच खाणारे! कोण कशाला पायावर धोंडा पाडून घेणार? एव्हढ मात्र खरं.. त्या नव्या तरुण प्राचार्याने तुमच्या नाकात दम आणला. त्याच्यापुढे तुमचं काही चालल नाही. मग तुम्ही त्याला हटविण्याचा प्रयोग सुरू केला. तुमच्याकडे भुंकणाऱ्या कुत्र्यांची कमी नव्हतीच. पण ते प्राचार्यदेखील कच्चा गुरूचे चेले नव्हते. अन् कर नाही त्याला डर कशाला? एक मात्र खरं, त्याने तुमच्या वयाचा नेहमीच मान ठेवला. तुम्ही कितीही त्रास दिला तरी त्याने उलट वार केला नाही कधीच. त्यांचे धोरण म्हणजे आपल्या कामाशी काम. त्यांना असे छक्के पंजे माहितीच नव्हते तुमच्यासारखे. जेव्हा अगदीच डोक्यावरून पाणी जायला लागलं तेव्हा मात्र त्याचाही नाईलाज झाला. तुमच्या कारवायांचे ठोस पुरावे उपलब्ध होते कागदोपत्री. ते त्याने सरळ सरकार दरबारी दिले पाठवून. तुम्हाला आता पायउतार होण्या शिवाय पर्यायच नव्हता.तुम्ही खूप प्रयत्न केलेत. याला भेट, त्याला भेट. अगदी राजकारणी पुढारी, मंत्री यांचे उंबरठे झिजवले तुम्ही. विद्यार्थी संघाकडून दबाव आणून पाहिलात. पण म्हणतात ना, कठीण समय येता कोण कामास येतो? तुम्ही राजीनामा द्यायची टाळाटाळ करीत राहिलात.शेवटी सरकारनेच तुम्हाला रस्ता दाखवला बाहेरचा!

सांगा सर,काय मिळवलं तुम्ही हे सगळं करून? सॉरी, पण तुम्हाला सर म्हणण्याची देखील लाज वाटतेय आम्हाला! शिक्षक देखील किती खालच्या पातळीवर जाऊ शकतो हे तुम्ही सप्रमाण सिध्द केले. आता तुमची गच्छंती झाल्यावर पुन्हा मीडिया सक्रिय झाली. तुमच्या विरोधात आडीयो, व्हिडिओ क्लिप्स बाहेर यायला लागल्या. पाण्यातून बाहेर फेकला गेलेला मासा शेवटची तडफड करतो हातपाय हलवून! ज्या विद्यार्थी संघाने तुम्हाला थोडेफार मोठे केले, त्यांच्याच पदाधिकाऱ्यांना तुम्ही आता नावे ठेवायला लागलात. तुम्ही कृतघ्नपणाच्या देखील सीमा ओलांडल्या. कुणीही तुमच्या मदतीला यावेळी धावून आले नाहीत. तुमचे मोठमोठ्या पदावर पोहोचलेले विद्यार्थी, तुमच्या विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, तुमचे सहकारी, तुमचे नातेवाईक, तुमचे कुटुंब साऱ्यांनी पाठ फिरवली तुमच्याकडे. तुम्ही एकटे पडलात, सपशेल हरलात.एरवी बोलण्यात, भाषणात उपदेशाचे, चारित्र्याचे डोज पाजण्यात तुम्ही वाकबगार होता. राजकारणी शिबिरांत व्याख्यान झोडीत होता.पण आयुष्याच्या संध्याकाळी तुम्हाला असा तडाखा बसला, की तुमची बोलतीच बंद झाली! घायाळ जटायू सारखी तुमची स्थिती झाली. जटायू प्रामाणिक तरी होता. पण तुम्ही? एका शब्दात सांगायचं तर चापलूस! कुणाच्या तरी खांद्यावर बसून,कुणाचा तरी पाय ओढूनच तुमचा सगळा चढतीचा प्रवास झाला. म्हणूनच आता तुमचे विद्यार्थी, तुमचे सहकारी,तुमचे नातेवाईक कुणीच तुमच्या बद्दल चांगलं बोलत नाहीत.

सहकार्यामध्ये देखील तुम्ही नेहमी चुकीच्या माणसाची बाजू घेत राहिलात. जो फसला आहे, अडचणीत आहे त्याचे भरपूर देवघेव करून काम करून द्यायचे. त्याला उपकृत करायचे. म्हणजे तो नेहमीसाठी तुमच्या पुढे गुढगे टेकायला मोकळा! अशा लाचार, लाळघोट्या माणसाची एक फौजच तुम्ही तयार केली. तसाही आपला समाज बहुतांशी भ्रष्टाचाराने किडलेला. सर्वांना सर्व काही कष्ट न करता इन्स्टंट हवं. त्यासाठी हवा तसा पैसा खर्च करायची तयारी. कारण खर्च केल्याच्या दुप्पट नंतर वसूल करता येईल हा आत्मविश्वास..तोही तुम्हीच दिलेला! त्यामुळे सुरवातीला तुमचा धंदा जोरात चालला. हो धंदाच म्हणायला हवं. पण अशा दुष्कृत्यांचा देखील कधीतरी शेवट होतोच. अल्पावधीतच त्या यंग प्राचार्या ने तो सुरुंग लावला. तुमचे साम्राज्य उध्वस्त झाले.

आमचे डोळे उघडले. सगळं काही पैशाने विकत घेता येतं, साधल्या जातं हा भ्रम आयुष्याच्या शेवटी खोटा ठरला. तुमच्या बरोबर आम्हालाही धडा शिकवून गेला. निदान मला तरी साक्षात्कार झाला. अशा आड मार्गाने मिळवलेल्या यशाला काही अर्थ नसतो. मानसिक समाधान,आनंद हिरावला जाणार असेल तर काय उपयोग यशाचा, पैशाचा? आपण काही चूक करीत असलो की सारखी टोचणी लागत राहते अंतर्मनाला. म्हणजे आपण जे केलं, जे करतोय ते काही ठीक नाही हे आपलं आपलाल्याही कळत असतं. तरी आपण कसल्या तरी नशेत, धुंदीत वाहवत जातो. शाश्वत काय अशाश्वत काय याचा विवेक गमावून बसतो.आपले वागणे, आपली कृती हाताबाहेर गेलेली असते. आपण स्वतः वरचे नियंत्रण गमावून बसतो. जेव्हा जाग येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते.

पण मला वाटतं,माझ्या बाबतीत वेळ निघून गेलेली नाही. लोक मला वेडे म्हणतील. म्हणू देत. देर आये दुरुस्त आये अशी म्हण आहे. उशिरा अक्कल आली, पण आली तर खरी!

माणसाला जगायला काय फारसे काही लागत नाही. आपणच आपल्या गरजा वाढवत जातो. मग काय अधिक गरजा, अन् त्यासाठी अधिक पैसा, अधिक भ्रष्टाचार असं दुष्ट चक्र सुरू होतं. मला या चक्रातून बाहेर पडायचं आहे. मला फक्त साधेपणानं, सुखाने जगायचे आहे. त्यासाठी या वाममार्गाने मिळवलेल्या पदवीची काही गरज नाही. मला आता समजून चुकलय.पदवीच, शिक्षणाचा, कमाईचा, श्रीमंतीचा अर्थाअर्थी काही परस्पर संबंध नसतो. आपण शिकूनही जर आपल्याला चांगल्या-वाईटाची पारख नसेल, नीती अनीतीची चाड नसेल तर काही उपयोग नाही शिक्षणाचा, अन् पदव्यांचा? सुखाने जगण्यापेक्षा सुखाने मरणं जास्त महत्वाचे. मला हेच हवे आहे यापुढे. पदवी परत घ्यायचा विद्यापीठात नियम आहे की नाही, मला माहित नाही. पण किती गोष्टी आपण अशा नियमाने करतो? नियम, कायदे पावलोपावली तोडण्यासाठीच आपल्याला स्वातंत्र्य हवे होते का? मला शंका आहे. वेड्यात काढतील लोक मला. समजू देत वेडे! काय फरक पडतो? तसाही हे जग म्हणजे वेड्यांचाच बाजार आहे. त्यात एकाची भर पडली असं समजायचं!

# विद्यार्थी शिकेल, पण...



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**शाळा हे संस्काराचं केंद्र आहे. असे असतांना सर्व विद्यार्थ्यांसमोर आपण समतेनं नजरेत आलो नाही आणि आपण जर विषमतेननं वागत असलो तर विद्यार्थी मनात समस्या निर्माण होतात. जरी आपण विद्यार्थ्यांसमोर समता वापरत असलो आणि इतर ठिकाणी विषमेनं अधिवास करीत असलो, आपले आचारविचार तसेच ठेवत असलो, तरी आपण वर्गात जाताच आपल्या वागण्यातून पदोपदी विषमता दिसेल. म्हणून लोकांनी विशेषतः शिक्षकांनी तरी विद्यार्थ्यांसमोरच नाही तर इतरत्रही विषमतेनं वागू नये. समतेनंच वागावं.**

शाळा ही विद्यार्थ्यांचं भवितव्य आहे. तिथं समता असणं गरजेचं आहे. आपण जर शाळेतच विषमता पाळत असलो तर ती विषमता आपल्या वागण्यातून नक्की दिसेल. कारण जसं बीज आपण पेरतो. तेच बीज पुढं अंकुरतं. पेरुच्या झाडाला कधीही आंबे लागत नाही. तिच ठेवण असते त्यांची. कारण निसर्गानं त्या झाडाला तसं बनवलं आहे. माणसाचंही तसंच आहे. जर एखाद्या माणसाच्या मनात कुविचार शिरलेच तर त्याच्या मनात सुविचार शिरायला वेळच लागतो. सुविचार लवकर येत नाही माणसाच्या मनात. तेच संस्काराचं आहे. शाळा हे संस्काराचं केंद्र आहे. असे असतांना सर्व विद्यार्थ्यांसमोर आपण समतेनं नजरेत आलो नाही आणि आपण जर विषमतेननं वागत असलो तर विद्यार्थी मनात समस्या निर्माण होतात. जरी आपण विद्यार्थ्यांसमोर समता वापरत असलो आणि इतर ठिकाणी विषमेनं अधिवास करीत असलो, आपले आचारविचार तसेच ठेवत असलो, तरी आपण वर्गात जाताच आपल्या वागण्यातून पदोपदी विषमता दिसेल. म्हणून लोकांनी विशेषतः शिक्षकांनी तरी विद्यार्थ्यांसमोरच नाही तर इतरत्रही विषमतेनं वागू नये. समतेनंच वागावं.

उदाहरण डॉक्टर बाबासाहेबांचं देता येईल. बाबासाहेब जेव्हा शिकत होते, तेव्हा त्यांना शिकविणारे शिक्षक आंबावडेकर हे विशेषता विषमता पाळणारेच होते. परंतू ते तेवढ्या प्रमाणात विषमता पाळणारे नसतील. म्हणूनच त्यांनी बाबासाहेबांना आंबेडकर नाव दिलं. गुरु हा मुख्यतः जातीभेद पाळणारा नसावा. तसेच मुलंमुली हाही भेदभाव पाळणारा नसावा.

अलिकडे शिक्षकांच्या शिकवणूकीचं निरीक्षण केल्यास असं निदर्शनास येतं की काही शिक्षकांना मुली जास्त आवडतात. त्याचं कारण म्हणजे मुली अभ्यासाच्या गोष्टी पटकन ऐकतात. लवकर स्वाध्याय सोडवतात. पर्यायानं सांगायचं झाल्यास मुली या अभ्यासात हुशार असतात. त्या अभ्यासात हुशार असल्यामुळं शिक्षकांना आवडतीलच. याचाच अर्थ असा की जी मुलं कमकुवत असतात. त्या मुलांकडे दुर्लक्ष होते. शिक्षक तिही मुलं आपलीच समजून तिही मुलं पुढं जायला हवी असा विचार न करता त्या मुलांना शिकविण्यातून मागे पाडतात. त्या मुलांकडे लक्ष देत नाहीत. का? तर ते ऐकत नाहीत. अभ्यास करीत नाहीत. वारंवार सांगूनही कंटाळा येतो. परंतू मार्ग नसतो. शेवटी त्याच मुलांकडे दुर्लक्ष होवून ती मुलं मागे पडण्यामागे महत्वाचे कारण आहे, ते म्हणजे आपलं प्रेम. आपण ती मुलं अभ्यास करीत नाही. म्हणून त्यांचा राग करतो. त्या मुलांना कधी जवळ घेत नाही. सारखे रागावतो. अलिकडे शिक्षणात रागावण्यावर बंदी घातली आहे तरी. हा आपला भेदभावच आहे. समजा आपल्याच घरात असा एखादा मंदबुद्धी मुलगा जन्मास आला तर आपण त्यांना फेकून देतो का? कधी रागावतो का? नाही ना. मग अशा मुलांची आपण हेळसांड का करावी. तेही आपलेच विद्यार्थी ना हुशार मुलांसारखेच. मग त्याचा अजिबात राग करु नये. त्याला जवळ घ्यावे. कुरवाळावे व कोणताही भाग त्याला आपलंसं करुन समजावून द्यावा. जेव्हा त्या मुलाला आपण जवळ घेवू. कुरवाळू. प्रेम देवू. तेव्हाच तो मुलगा तुम्हालाही आपला समजेल. अभ्या  करेल व शिकेल. त्याला समस्या येणार नाही. त्याला तुम्ही आवडाल. जवळच्या वाटाल. हवं तर तो तुम्हाला चांगला प्रतिसाद देईल. हुशार बनेल व साहजीकच पुढं जाईल.

आज काळ तंत्रज्ञानाचा आहे. जुनं पिढीजात शिक्षण आज कालबाह्य झालं आहे. ते मागे पडलं आहे. त्या शिक्षणाला आता कोणीही विचारत नाही. अगदी डीजीटल शिक्षणाला आज विचारलं जातं. आपण नेहमी पाहतो की घराघरातील लहान मुलं मोबाईल बघतात. मोबाईल न दिल्यास ती मुलं रडतात. त्यांना मोबाईलवरचे खेळ आवडतात. कार्टून शो आवडतात. त्यांना मोबाईलच्या दुष्परीणामाचं काही घेणं देणं नाही. मोबाईलनं डोळे खराब होतात. कान खराब होतात. हे काही त्यांना कळत नाही. फक्त मोबाईलवर दिसणारी दृश्य ती मग कितीही वाईट असली तरी ती मुलांना आवडत असतात. तशीच ती विद्यार्थ्यांनाही आवडतात. तेव्हा हाच दृष्टीकोन अंगीकारुन शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना शिकवितांना मोबाईलचा शैक्षणीक साहित्य म्हणून वापर करावा. शासनानंही त्याला परवानगी द्यावी. तसेच जी परवानगी शासन देईल. त्या परवानगी स्वरुपात शिक्षकांनी मोबाईलचा अतिवापर वा गैरवापर टाळावा. हे झालं डीजीटल शिक्षण. यासोबतच शिक्षकांनी खेळ शिकवावे. खेळ विशेषतः मुलांना जास्त आवडतात. स्पर्धा घ्याव्यात. स्पर्धेत मुलांना जिकीरीने भाग घ्यायला आवडते. तसेच वेगवेगळे उपक्रम घ्यावेत. हे सर्व ठीक आहे. परंतू हे तेव्हाच साध्य होईल, जेव्हा तुम्ही विद्यार्थ्यांवर प्रेम कराल. तुम्ही जेव्हा त्यांच्या र प्रेम कराल, तेव्हा तिही मुलं तुमच्यावर प्रेम करतील. मग तुमचं सर्वच ऐकतील. तुम्ही जे सांगाल ते.

आज स्पर्धेचा काळ आहे. लोकं पुर्वीसारखे अनाडी राहिलेले नाही. अगदी थोड्या थोड्या कारणासाठी मुलांचे पालक शाळेत  येत असतात. अगदी थोडंसं रागावलं तरीही. तेव्हा अशा काळात शिक्षकाने विद्यार्थ्यांना शिकवावे कसे हा प्रश्न पडलेला आहे. तेव्हा अशा खेळाच्या माध्यमातून जर विद्यार्थ्यांना शिकवले. तर विद्यार्थी शिकतील. ते केवळ शिकतीलच नाही तर चांगलं अर्थपुर्ण शिकतील. खेळातून व्यायाम होतो. बुद्धीचा विकास होतो. जिद्द, चिकाटी वाढीस लागते व हव्या तशा ज्ञानाचीही माहिती होते. परंतू यामध्ये विद्यार्थ्यांना भेदभाव दिसायला नको. कारण खेळत असतांना काही मुलं बाहेर राहतात सहभागी होत नाही. कारण मर्यादा असते. तेव्हा असे खेळ शिकवितांना सर्वांना सहभागी करुन घ्यावं. एकही सुटता कामा नये. विशेषतः त्यासाठी गट करावेत. तेव्हाच सर्व मुलांना शिकता येईल. काही करुन दाखविण्याची संधी मिळेल व भेदभावही दिसणार नाही. त्यानंतर कोणालाही विद्यार्थी शिकेल, पण... असं म्हणण्याचीही वेळ येणार नाही.

# 'शिक्षक' : साध्या वेशातील 'सैनिक'

आधुनिक केसरी

**देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी, देशाच्या रक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेऊन जीवाची पर्वा न करता देश सेवेसाठी सर्वस्व त्यागाच्या भावनेतून काम करणारे सैनिक (जवान) पहारा देत असतात, म्हणून देशवासी निश्चिन्त, सुखाचे जीवन जगू शकतो. असेच काम शिक्षकही करत असतात, माणूस घडवण्याचे काम, शिक्षणातून शिक्षक करतात. पिढी घडते. चिखल गोळ्याला आकार देतात, अंकुराला पोषकतेसाठी जगवताना, देशाचे भविष्य आणि भवितव्य घडवत असतात! म्हणून गुरूला परमेश्वर समान मानले जाते.गुरुपुजन होत असतं. ध्येयप्राप्तीसाठी सर्वांनाच मार्गदर्शकाची, गुरुची गरज असते. असेच एक शिक्षक देशाच्या सर्वोच्च स्थानी विराजमान झाले होते, त्या डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म दिन निमित्याने शिक्षकांचा सन्मान म्हणून काल 5 सप्टेंबर रोजी "शिक्षक दिन" सर्वत्र साजरा झाला असतानाच देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. तशीच भारतीय शिक्षण प्रसारक संस्था देखील वाटचाल करत आहे.**

राष्ट्र हिताचे शिक्षण, भारतीय शिक्षणाची बीजे रुजवण्यासाठी, गुलामीचे शिक्षण देणारी शिक्षण प्रणाली झुगारून मोजक्या शिक्षकांनी प्रतिकूल परिस्थितीत ही संस्था, शैक्षणिक संकुल, एक संस्कार केंद्र म्हणून सुरू केले. 70 वर्षांपूर्वी लावलेले रोपटे आज वटवृक्ष झाला आहे. राष्ट्रहिताचे आणि भारतीय शिक्षणाला प्राधान्य देणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अमलात यावे यासाठी उपसलेल्या कष्टाला आता फळ येऊ लागले आहे. ही या संस्थेची एक साधना आहे. या साधनेच्या वाटेवर "शिक्षण पंढरी"कडे जाण्याच्या "वारी मार्गावर"

बीड मधील सावरकरांच्या नावाने एक पालखी "शिक्षणातून माणूस घडवण्याचा" कार्य जप करणारी आहे.

"शिक्षक"- हा साध्या वेशातील सैनिक आहे" हे सावरकरांचे विचार दर्शन प्रत्यक्षात इथे दिसून येते. या संस्कार केंद्रातून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून शिक्षक-पालक संघ कार्यरत आहेत. आज 5 सप्टेंबर शिक्षक दिन आणि मी या पालखी मार्गावरचा सेवेकरी, वारकरी म्हणून मला खूप समाधान आणि आनंद आहे. माझ्या या दिंडीत उच्च विद्याविभूषित होण्याची सातत्याने कास धरणारे, एमफील, पीएचडी सह नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करत करत ज्ञानदान करणारे एकूण 55 पैकी 19 भगिनी आणि 36 बंधूचीं मला सोबत मिळाली आहे. विद्यालयास जोडून उच्च माध्यमिक विद्यालय आहे, त्यासाठी 18 प्राध्यापक बंधू आहेत. 24 शिक्षक आणि इतर शिक्षण प्रणालीत सहकारी बांधव आहेत.

शिक्षिका भगिनींना मी मातृ स्वरूप मानतो. सर्वच क्षेत्रात मुली, महिला यांचा मोठा सहभाग आणि तो देखील यशस्वीतेच्या चढता आलेख घेऊन असतो, याचा सार्थ अभिमान आहेच. घर संसार सांभाळत नोकरी करणे हे प्रत्यक्षात खूप अवघड काम आहे. शिक्षिका हे अवघड काम अत्यंत कुशलतेने कोणत्याही तक्रारी शिवाय सोपे करतात, माझा मुलगा किंवा मुलगी मी या वर्गात शिकवते आहे ही भावना ठेवून शिक्षणाचे पवित्र काम करतात, हे मी



माझ्या सावरकर विद्यालयात जवळून अनुभवतो आहे. प्रत्येक भगिनींचे वेगळी वैशिष्ट्ये सांगता येतील पण वेगळा नामोल्लेख न करता, "आई" ही पहिली गुरु असते त्याच मातृ भावनेतून सर्व विद्यार्थ्यांवर शिक्षण कर्तव्य करणाऱ्या सर्व शिक्षिका (ताईंच्या) कार्याबद्दल आदरभाव व्यक्त करत सेवेला विशेष प्रणाम करतो.

प्रत्यक्ष शिक्षण देणारे शिक्षक महत्त्वाचे तसेच शिक्षण प्रणालीत सेवक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी, ग्रंथपाल, तंत्रज्ञान सहाय्यकरी मंडळीचे योगदान याच निमित्तानेही लक्षात घेतलेच पाहिजे. मागच्या एका वर्षात शिक्षक बंधूंना समजून घेण्याचं भाग्य मिळाले, पैकी काहींची गुणवैशिष्ट्ये मला भावली, ती शिक्षक दिनाच्या निमित्ताने व्यक्त करण्याचा प्रयत्न करत आहे.

शिक्षक म्हटलं की तो आदर्श असतोच. "आदर्श शिक्षक"

पुरस्कार हा प्रातिनिधिक स्वरूपाचा मानला पाहिजे. माझ्या नजरेतून शिक्षक असणे हाच सर्वोच्च सन्मान त्यास प्राप्त असतोच.

संजय विभुते सर-मुख्याध्यापक, प्राचार्य, कठोर पालक, काटेकोरपणा, शिस्त, नियमावर बोट पण संयमाने. कमी बोलत शैक्षणिक कार्य पार पडणारे. कर्त्या कुटुंबप्रमुखाची जबाबदारी आईच्या भूमिकेत सर असतात.

काळे सर विठ्ठलाप्रमाणे सर्वांवर नजर ठेवत, सारखा प्रेमाचा वर्षाव करत, आपल्या कर्तव्यात कसूर न होऊ देता सर्वांना समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या मित्राची भूमिका बजावतात.

माधव सर विविध गुण संपन्नता प्राप्त करण्याचा ध्यास ठेवून, तो ठेवा योग्य त्याच्या पर्यंत पोहोचवण्यासाठी सतत कार्य मग्न असणारे जोशी सर.

चव्हाण सर नावाप्रमाणे रेषा त्या पण वेड्यावाकड्या नको तर सु म्हणजे "सुरेश " चांगल्या, सरळ काहीतरी बोध देणाऱ्या म्हणजे निर्जीव चित्राला सजीवात रूपांतर करण्यासाठी जीव ओतणारे एक कलाप्रेमी मनाचे सर.

तांबारे सर नावातच दत्तात्रय वेगवेगळ्या मार्गदर्शकाकडून जेजे मिळवता येईल ते मिळवणे, समजून घेणे आणि शांत संयमाने निवडक स्वरूपात त्याची विभागणी करत ते वाटप करण्याचे काम, जवळ (मनात) काही न ठेवता करत राहण्याचा स्वभाव.

जगताप सर- ज्ञानयज्ञ सेवेकरी स्वभाव. कुशलतेने आणि समय सुचकतेने, सावधपणे मार्गावर चालत राहणे. सर्वांना आधार -प्रेम -प्रेरणेचा वसा पेरते ठेवणारे उमेश सर.

शिवाजी गायकवाड सर- मैदान- मातीवर प्रेम करणारे. क्रीडा-खेळ यात जय- पराजय असतो, पराजयाची कारणे शोधत जय मिळवण्यासाठी, तो मिळेपर्यंत कसोटीवर विद्यार्थी मन घडवणारे एक तैनात खंदा - बंदा शिक्षक बंधू.

हरिभाऊ - वाहन चालवणाऱ्याची स्पीड आणि ब्रेक याच्यावरली पकड महत्त्वाची असते तसाच विश्वास आपल्या स्कुल बस मधील सर्वांना वाटावा तसेच हरिभाऊ साबळे सर. नावाप्रमाणे प्रत्येकाला हरीच्या नजरेत पाहत आपला भाऊ असल्याचा विश्वास सार्थ करणारे सर.

राऊत सर - घेतलेली, मिळालेली जबाबदारी नीटनेटकेपणाने पार पाडत, जी शक्य तेवढी मदतती साठी तयार असणारे माधव सर.

शरद सर - स्वतः उत्साही रहात इतरांना उत्साही ठेवण्यासाठी धडपडणारा स्वभाव. पाण्यातून मासा बाहेर जास्त काळ राहत नाही त्याला पाण्याची ओढ असते त्याप्रमाणे उत्साहाच्या सागरात राहण्याची ओढ ठेवणारे ढवळे सर.

अभय सर - शाळाबाह्य उपक्रमासाठी, विविध स्पर्धात यश मिळवण्यासाठी, अभ्यास पूरक मन ,निर्भय मन मुलांचे तयार करणारे अभय गवई. यांच्यामुळे मुलांना समाजाची आणि समाजाला विद्यार्थ्यांची ओळख व्हावी आणि धाडसाने प्रवाहात किंवा प्रवाह आपल्या बाजूने करण्यासाठी सिद्ध होण्याची प्रेरणा देणारे मार्गदर्शक शिक्षक.

रमण सर - कशातही रममान होणारा स्वभाव. तुम्हाला हा शर्ट खूप चांगला दिसतो ,त्वरित प्रतिक्रिया देतात. गीत, संगीत ,संस्कृत ,संगणक अशा वेगवेगळ्या सप्तसुरांना एकत्र बांधण्याचा सतत धडपडणारा नम्रतेचा स्वभाव ठेवून चालणारा शिक्षकमित्र .

विनायक कुलकर्णी सर - जसा दिसण्यात नीटनेटकेपणा, तसाच बोलण्यात. स्पष्टता ,खडा आवाज आणि स्वच्छ विचारधारा. चांगल्याला चांगलं म्हणत, सोबतही करणारा सहकारी बंधू .

नवले सर -कमी बोलणे पण महत्त्वाचे बोलणे. आपल्याला आनंद मिळावा दुसऱ्याला 'संतोष 'व्हावा यासाठी काटेकोरपणा ठेवत सतत कार्यरत राहणारा स्वभाव.

श्रवण कुलकर्णी सर- वडिलांकडून गणिताचा वारसा पुढे चालवत, डोक्यात गणित हेच ठेवणारा की मुले -विद्यार्थी आयुष्यातील कोणत्याही गणितात मागे राहू नये ,एक उंची गाठून सर्वांचे गणित उंचीवर घेऊन जाणारे ट्रॅकर शिक्षक कार्यकर्ता.

सर्व शिक्षकबंधू भगिनी, मार्गदर्शक सहकारी,शिक्षण प्रेमींना शिक्षक दिनाच्या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा, वंदन करतो.

प्रमोद कुलकर्णी
संपर्क क्र. 9403904651

# कथा : पुरस्कार

आधुनिक केसरी

**मालतीबाई लगबगीने शाळेच्या फाटकाकडेनिघाल्या होत्या.....वरिष्ठ मुख्याध्यापिका असल्याने शाळेत वेळेच्या आधी,व सर्व शिक्षक शाळेत यायच्या आधी आपण शाळेत वेळेत पोहोचलेच पाहिजे,असा त्यांचा दंडकच होता..... शिस्तप्रिय,हसतमुख,वक्तशीरपणा आणि शाळेचा दर्जा सतत उंचावत ठेवणाऱ्या अशा या मालतीबाई.त्यांच्या याच गुणामुळे यंदा त्यांना शासनाचा मानाचा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मा.राष्ट्रपतींच्या हस्ते जाहीर झाला होता.**

कपाळावरचा आलेला घाम पुसतच मालतीबाई फाटकाच्या आत शिरताच ,शाळेचा शिपाई लगबगीने पुढे आला व त्याने मालतीबाईना नमस्कार घातला, व तो म्हणाला , 'बाई तालुक्याला ११ वाजता मिटिंग हाय,तालुक्याच बोलावण आलय '.तशा मालतीबाई मनात चमकल्याच!....तालुक्याला जाणारी गाडी तर १०.३० वाजता आहे.म्हणजे आता लवकरच निघायला हवं...मनाशीच पुटपुटत त्यांनी कपाटातील मिटींगसाठी लागणारी फाइल काढण्यास सुरुवात केली. तसेच आलेल्या शिक्षकांना दिवसभराच्या कामाच्या सूचना देवून,त्या परत शाळेच्या फाटकाच्या बाहेर पडल्या.,तालुक्याला जाणारी गाडी गाठण्यासाठी...



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

मालतीबाईनी भराभर चालतच बसस्थानक गाठले.बसस्थानकावरची गर्दी पाहून त्या मनोमन हबकल्या.!...... कारण तालुक्याला जाणारी १०.०० वाजता असणारी बसच अजून आली नव्हती आणि त्यामुळेच गर्दी वाढली होती.तेवढ्यात बस आल्याचा आवाज आला. बस स्थानकामध्ये येऊन थांबली. जसा नदीला पूर यावा तसा गर्दीचा लोंढा गाडीत शिरू लागला. मालतीबाईना गाडीत चढता येईना.गाडी प्रवाश्यांनी गच्च भरली,....तसा कंडक्टर राहिलेल्या लोकांना व गाडीत चढू पाहणाऱ्या लोकांना मागे ढकलू लागला. मालतीबाई धीर करून पुढे सरकल्या.त्या बसच्या पहिल्या पायरीवर असतानाच, कंडक्टरने डबल बेल मारली आणि गाडी गुरगुर आवाज करत चालू झाली ...आणि तेवढ्यात !गाडीतून कोणीतरी जोरात ओरडले . 'कंडक्टर गाडी थांबवा', माझी आई खाली राहिली आहे .....क्षणभर गाडीत शांतता पसरली. कंडक्टरने खाली पाहिले,.... आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून परत बेल मारली . नुकतीच चालू झालेली गाडी परत उभी राहिली. 'क्षणभरच' अगदी क्षणभरच ,मालतीबाई गडबडल्या,पण आपण खाली पडता पडताच वाचलोय. याचीही त्यांना जाणीव झाली...

पण आपल्याला "आई" म्हणणारा गाडीत कोण आहे? याचे नवल करतच त्या पहिल्या पायरीवरून गाडीत आत शिरल्या. कंडक्टरने डबल बेल मारतच गाडी पुन्हा सुरु झाली. तसे मालतीबाईचे मनही वेगाने धावू लागले...आपणाला "आई'म्हणणारा तरुण आपल्याच शेजारीच आपल्याकडे पाहून स्मितहास्य करत आहे,हे त्यांनी पाहिलं...

मालतीबाईनी त्या तरुणाच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवत विचारल, बाळ तू कोण ? तुझ नाव काय ? तेवढ्यात तो तरुण त्यांच्या पायाशी हात लावत म्हणाला, 'मी शरद काकडे तुमचा विद्यार्थी . मी आर्मीत असतो'.आणि मालतीबाईच्या डोळ्यात क्षणभरच अश्रू तरळले. आपला विद्यार्थी ! आणि त्याने आपल्याया "आई " ही केवढी उपाधी दिली.!....केवढा मोठा पुरस्कार होता तो?

तालुक्याच्या ठिकाणी गाडी थांबताच मालतीबाईनी त्याला तोंडभरून आशिर्वाद दिला.... . व त्या खाली उतरल्या .मनात भावनांचा कल्लोळ उठला होता . शासनाचा तो 'मानाचा पुरस्कार',हार ,तुरे,श्रीफळ ,मानचिन्ह यापेक्षाही "आई" हा आपल्या विद्यार्थ्याने दिलेला मोठा "पुरस्कार" मनात घेऊन त्या मिटींगच्या ठिकाणाची वाटचाल करू लागल्या...

# आम्ही पण शिक्षक

आधुनिक केसरी

**आज समाजामध्ये मागील काही दिवसापासून शिक्षकांविषयी त्या परिस्थितीविषयी उलट सुलट चर्चा सुरू आहे. खरं तर ही खूपच शोकांतिका आहे की, समाज घडविणाऱ्या गुरुवर्यावर अशी टीकाटिप्पण होणे असो, शासनाच्या विविध धोरणामुळे आज विनाअनुदानित आणि स्वयम अनुदानित,अंशतः अनुदानित, कायम विनाअनुदानित असे अनेक प्रकार शिक्षकांमध्ये करण्यात आले.**

खरंतर सर्व शिकवणारे समाज घडविणारे शिक्षक आहेत त्यामध्ये असा भेदभाव चुकीचा आहे पण असो आज जो विषय मी या लेखाद्वारे आपणासमोर मांडणार आहे तो विषय म्हणजे आपल्या मानधनावरून अनेकांचा चेष्टेचा विषय होणारा पण आंतरराष्ट्रीय माध्यमातून शिकवणारा इंग्रजी माध्यमाचा शिक्षक शासन दरबारी वंचित तर आहेच पण शैक्षणिक वर्तुळातही त्याचा विनोद केला जातो अनेक शैक्षणिक चर्चांमध्ये कार्यक्रमांमध्ये बोलताना स्वयंघोषित शिक्षण तज्ञ त्या शिक्षकांचा उल्लेख पाच हजारावर शिकवणाऱ्या मास्तरच्या शाळेत पोरं टाकतात, असा करतात त्यावेळेस खरंच मनाला वेदना आणि दुःख होते वेदना आणि दुःख होते शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना जीव तोडून तन-मन-धनाने आम्ही काम करतो. आमच्या गुणवत्तेची तुलना,परिस्थितीने आमच्यावर लादलेल्या वेतनावर केली जाते. याचेच मनाला दुःख वाटते शासकीय परिस्थितीमुळे व कौटुंबिक परिस्थितीमुळे या माध्यमात काम करावे लागते या माध्यमात काम करताना प्रत्येक शिक्षक स्वतःचे शंभर टक्के योगदान देऊन समाजातील अनेक मातब्बर राजकारणी, समाजकारणी ,शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, क्षेत्रातील ,मान्यवरांच्या मुलांबरोबरच ग्रामीण भागात शेतकरी ,मोलमजुरी करणारे अशा सर्वांचे विद्यार्थी घडविण्याचे कार्य शिक्षक करत असतात. त्यांना नको आहे कोणता आयोग आणि कोणतीही वेतन वाढ फक्त असावी समाजात जगण्याची आणि आपल्या कुटुंबाला आपल्या मुलाबाळांना व्यवस्थित जोपासण्यासाठी आर्थिक मदत आणि शासकीय पाठबळ मिळणे खूपच गरजेचे आहे. कारण की जो समाजातील एक पिढी घडवतो त्याच्या कुटुंबाची जोपासना करता करता त्याच्या नाकी नऊ येतात .आर्थिक स्थैर्य नसताना व सामाजिक पाठबळ नसतानाही इंग्रजी माध्यमाचे शिक्षक आपला शंभर टक्के योगदान देऊन समाजातील पिढी घडविण्यास इतर शिक्षक बांधवांसोबतच समाजहिताचे कार्य करतात पण त्यांच्याकडे बघण्याचा समाजाचा, शैक्षणिक वर्तुळाचा दृष्टिकोन वेगळा का बर ?दैनंदिन क्लासवर, होमवर्क सोबतच विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कौशल्य विकासाकडे इंग्रजी माध्यमाच्या शिक्षकांचेही इतर शिक्षक बांधवांसारखेच लक्ष असते राहिला विषय स्वयम अनुदानित प्रकाराचा तर इंग्रजी माध्यमात चे संस्थाचालक विशेषतः ग्रामीण भागातील संस्थाचालक अनेक अडचणींना तोंड देऊन या संस्था चालवत असतात आरटीई परतावा अनेक वर्ष न मिळणे, ग्रामीण भागात वेळेवर फीस न जमा होणे, वर्ष वर्ष फिस बाकी राहणे या अशा अनेक अडचणींना तोंड देत ते आपली शाळा सांभाळत असतात परिस्थिती जर आता याच माध्यमातून शिकण्याची आपल्या बालकांना शिकवण्याची असेल तर प्रशासनाने शासनाने आणि समाजानेही इंग्रजी माध्यमांच्या शिक्षकांकडे एका चांगल्या दृष्टिकोनातून बघितले पाहिजे व त्यांना पाठबळ दिले पाहिजे इंग्रजी माध्यमाच्या शैक्षणिक प्रवाह समाविष्ट केले जात नाही कोणत्याही पुरस्कारासाठी त्यांचा विचार केला जात नाही हीच खरी शोकांतिका आहे म्हणूनच मी माझ्या एका कवितेत म्हटले आहे



संदिप वाकडे पाटिल
संपर्क क्र. 9766992776

आम्ही ही शिक्षक
सांगा आमचं काय चुकलं
अहो आम्ही पण शिक्षक
तुटपुंजा मानधनावर काम करणारे
क्लास वर्क होमवर्क मध्ये गुरफटणारे
इंग्रजी माध्यम म्हणून शासन दरबारी
अनास्थलेले
आम्ही पण शिक्षक आम्ही पण शिक्षक
आम्हा नको वेतनवाढ नको कुठला आयोग
आम्ही पण शिक्षक अध्यापन करणारे
आम्हाला स्वाभिमान जगण्यापुरता आधार
कारण आम्हावरही आहे हो समाज
घडविण्याचा भार
परिस्थितीमुळे करतो आम्ही इंग्रजी माध्यमात
काम
एक वेळ जेवणासाठी होते आमची मार मार
म्हणायला शिक्षक पण आमचे भविष्य कोरे
घडवितो भविष्य पण आमचा संसार कोण
शिवेल
अनुदानित विनाअनुदानित आणि आम्ही
स्वयम अनुदानित
नका करू आमच्यात हो भेदभाव
शासन दरबारी द्यावी आम्हा थोडी तरी साथ

# अंबाजोगाई महावितरण कार्यालय व नगरपरिषद प्रशासन, पदाधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : गोविंद मस्के

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** परवाला मिलिंदनगर-गवळीपुरा भागातील प्राजक्ता किशन गायकवाड वय वर्षे १८ असणाऱ्या निष्पाप मुलीचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. याला सर्वस्वी जबाबदार अंबाजोगाई नगर परिषद प्रशासन आणि वर्षानुवर्षे एकलहाती सत्ता चालवत आलेले पदाधिकारी आणि वीजपुरवठा सुरळीत न ठेवणारे महावितरण कार्यालयाच असल्याचे ठाम वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे अंबाजोगाई शहराध्यक्ष गोविंद मस्के यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. तेंव्हा या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या या सर्वांवरती मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. नाहीतर वंचित आघाडीच्या वतीने टोकाचे आंदोलन करण्यात येईल, असा गर्भीत इशाराच गोविंद मस्के यांनी दै.आधुनिक केसरीच्या माध्यमातून दिला आहे.

अंबाजोगाई नगर परिषद आणि महावितरण कार्यालयामधील ढिसाळ कारभारामुळे व न.प.पाणी पुरवठा विभागाच्या नियोजन शून्य कारभारामुळे एका तरुण निष्पाप मुलीचा मृत्यू होण्याची ही दुःखद घटना अंबाजोगाईमधील गवळीपुरा भागातील मिलींदनगर परिसरात घडली. त्यास सर्वस्वी जबाबदार अंबाजोगाई नगर परिषद पाणी पुरवठा विभाग आणि महावितरणच आहे. या अधिकाऱ्यांना नियोजन करता आलेले नाही आणि त्यामुळेच ही दुःखद घटना घडली. ही बाब अत्यंत निंदनीय आहे.

ऐकदिवस आड किंवा फारतर दोन दिवसाला पाणी पुरवठा करण्यात यावा म्हणून शेकडो निवेदन नगरपरिषद अंबाजोगाईच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक यांना आणि तत्पूर्वी नगराध्यक्ष व



पाणीपुरवठा सभापतींना देण्यात आले आहेत. वर्षानुवर्षे 8 ते 10 दिवसाला पाणी सोडण्यात येत असुन ना या षंढ लोकप्रतिनिधींना ना मुख्याधिकारी यांना पाण्याच्या नियोजनाचे वेळापत्रक जमले. पावसाळा असो की हिवाळा वा उन्हाळा. जरीकरीता चांगला पाऊस पडला तरीही पाणी पुरवठा 8 ते 10 दिवसालाच....! तसेच हजारो विनंत्या महावितरण कार्यालयास केलेल्या आहेत की, आपली किरकोळ मेंटेनन्सची कामे प्रभाग निहाय तात्काळ करून घेऊन सातत्याने खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा. शिवाय जेंव्हा केंव्हा कामानिमित्त लाईट बंद राहणार आहे. आणि तो नेमका केंव्हा सुरू होणार आहे. तत्पूर्वीची कल्पना देणे. जेणेकरून अचानक लाईट येण्याने जीवघेणे अनुचित प्रकार घडणार नाहीत. परंतु असे अंबाजोगाई कधीच घडत नाही.

**अंबाजोगाईवरच हा अन्याय का......?**

अंबाजोगाई शहरातील पाणी पुरवठा आणि वीज पुरवठ्याचे एकंदरीत संपूर्ण नियोजन कोलमडले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी शहरवासियांना 10 ते 12 दिवसांची वाट बघावी लागते. उन्हाळा, पावसाळा अगदी धरणे भरले असतानाही ही समस्या बिचाऱ्या अंबाजोगाईकरांची सूटली नाही. शहरातील एखाद्या गल्लीत पाणी आले की, सर्व कामे सोडून लोकं पाणी साठवून ठेवण्यासाठी धडपड करत असतात. कारण त्यांना माहित आहे, नगरपरिषद पाणी सोडण्याचे दिवस कमी करत नाही पण जास्त मात्र करु शकते. पिण्याच्या पाणी भरण्यासाठी धडपड करत असतानाच काल-परवाला शहरातील गवळीपुरा भागातील एका मुलीचा मृत्यू झाला आहे. मन सुन्न करणारी घटना आहे. नगरपरिषद प्रशासनाने मात्र अंबाजोगाईकरांना वाऱ्यावर सोडले आहे.

**महावितरण कार्यालयही यास जबाबदार असल्याने तेथील अधिकारी-कर्मचाऱ्यांवरतीही गुन्हा दाखल झाला पाहिजे**

सातत्याने शहरातील वीज या ना त्या कारणाने खंडित होते. किरकोळ कामांमुळे आणि ढसाळ नियोजनामुळे सातत्याने वीज गायब राहत असल्याने मग अशात पाणी आले की, 8 ते 10 दिवसांच्या पाण्याचा साठा करण्याशिवाय दुसरा पर्यायच नसल्याने उच्चभ्रू लोकांच्या वसाहती सोडता जवळपास बाकी सर्वत्र पाणी आले रे आले की, ऐकच तुबड-हल्लाकलोळ उडतो आणि मग यातुन असे ह्रदयद्रावक प्रकार घडतात. शिवाय अनेक वेळा हाणामाऱ्या, शिवीगाळ यासह अन्य अनुचित प्रकार घडत असल्याने केवळ आणि केवळ नगरपालिका व महावितरण कार्यालयाच्या शुन्य व ढसाळ नियोजनामुळे विनाकारण कायदा व सुव्यवस्था बिघडत असल्याने पोलिस प्रशासनाचाही ताण अधुनमधून वाढलेला दिसून येतोय. तेंव्हा या पाणीपुरवठा प्रक्रियेत कमीजास्त भार महावितरणही टाकते आहे. याचीही दखल घेऊन त्यांनाही या प्रकरणात दोषी धरले जावे, अशी मागणी शहराध्यक्ष गोविंद मस्के यांनी केली आहे.

**अलीकडच्या काळात अंबाजोगाईतील सर्वच कार्यालयातील प्रशासनाचे कामकाजीय स्वरूप बदलले आहे**

अंबाजोगाईतील वरिष्ठ अधिकारी फक्त निवेदन घेण्यापुरतेचं मर्यादित राहिले आहेत....? कोणाचा कोणाला ताळमेळ नाही. अंबाजोगाई तालुका प्रशासनाचे हे नवे रूप अलिकडच्या काळात पहायला मिळते आहे. त्यातल्यात्यात विशेषतः अंबाजोगाई नगरपरिषदेचे ढिसाळ नियोजन, कारभार आणि महावितरणचा भोंगळ कारभार सुधारण्यासाठी अंबाजोगाई शहरातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी लक्ष देतील का....? असा प्रश्न सामान्य माणसाला पडला आहे.

या दुःखद घटनेनंतर तरी नगर परिषद पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी शहरातील पाणी पुरवठ्याचे व्यवस्थित नियोजन करावे, अन्यथा जनता या अधिकाऱ्याला जाब विचारण्यासाठी रस्त्यावर उतरेल. तत्पूर्वी या कालच्या घटनेच्या अनुषंगाने वरिष्ठ प्रशासनाने आणि विद्यमान स्थानिक आमदारांनी प्रथमतः नगरपरिषद-महावितरण कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यांवरती मन्युष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आणि त्या मृत मुलीच्या कुटुंबीयांनी दोन्ही कार्यालयाच्यावतीने आर्थिक स्वरूपात भरीव मदत करावी, अशी मागणी वंचित आघाडीच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा वंचित बहुजन आघाडी आपल्या पद्धतीने आंदोलन करून हे सर्व पीडित कुटुंबीयांच्या पदरात पाडून घेईल, असेही यावेळी मस्के बोलले. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निर्दयी नगरपरिषद आणि महावितरण अंबाजोगाई प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यात येत असल्याचेही सांगितले गेले.

## लासूर स्टेशनला महालक्ष्मीच्यापुढे साकारला हर घर तिरंगा चा अप्रतिम देखावा

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** दरवर्षी गणरायाची स्थापना झाल्यानंतर गौराईचे आगमन होते. महालक्ष्मीच्या आगमनाचे उत्सव मोठ्या उत्साहात तीन दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी आगमन दुसऱ्या दिवशी मिष्टन्यान भोजन तर तिसऱ्या दिवशी निरोप असतो. यावर्षी स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सव असल्याने लासूरच्या सायली क्षीरसागर यांनी महालक्ष्मीच्या पुढे स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सवाचा अप्रतिम देखावा साकारला आहे.

गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील सायली योगेश क्षीरसागर व कुटुंबीयांच्यावतीने दरवर्षी महालक्ष्मी उत्सव अखंडपणे वेगवेगळ्या पद्धतीने ज्वलंत प्रश्नावर देखावे साकारून साजरा केला जातो. मागील 8 वर्षापासून महालक्ष्मी उत्सवात विविध सामाजिक संदेश देणारी देखावे साकारून एक वेगळा आदर्श क्षीरसागर कुटुंबाने समाजासमोर ठेवला आहे. आत्तापर्यंत त्यांनी स्वच्छ गाव, सुंदर गाव, महाड सावित्री नदी



दुर्घटना, स्वच्छ भारत अभियान, साईबाबा समाधी सोहळा, कोल्हापूरची पूर परिस्थिती आशा अनेक विषयावर देखावे सादर केले आहेत. यावर्षी त्यांनी स्वातंत्र्याचा 75 वा अमृत महोत्सव हर घर तिरंगा या विषयांवर अप्रतिम देखावा साकारला आहे. अत्यंत बारकाईने हा देखावा सायली योगेश क्षीरसागर यांनी साकारला आहे. हा देखावा बघण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी क्षीरसागर यांच्या निवासस्थानी भेट देऊन कौतुक केले आहे.

**गेल्या आठ वर्षांपासून आमच्या घरी महालक्ष्मीचे आगमन होते. त्यामुळे भक्तीबरोबर सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन समता, बंधुता, सामाजिक एकता कायम राहावी म्हणून दरवर्षी आम्ही वेगवेगळे देखावे महालक्ष्मीच्या पुढे साकारत असतो. त्यामुळे हे देखावे पाहण्यासाठी पंचक्रोशीतील सर्वधर्मीय नागरिक येतात व महालक्ष्मीचे दर्शन घेऊन अनुभवाची शिदोरी सांगतात. त्यामुळे पुन्हा नवनवीन देखावे साकरण्याची प्रेरणा मिळते व दरवर्षी नवनवीन देखावे साकरण्यासाठी ऊर्जा मिळते.**

**सायली क्षीरसागर**

## ग्रामसभेत रफिक पटेल यांची बनशेंद्रा गावच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील बनशेंद्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकसमोर ग्रामसभा गावाकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली. या ग्रामसभेच्या अध्यक्षपदी सरपंच अंबादास मोरे होते तर ग्रामविकास अधिकारी अविनाश कोकणी यांची प्रमुख उपस्थिती होती. गावकऱ्यांनी अनेक ठराव यावेळी अध्यक्षाची परवानगी घेऊन मांडले. गावातील अनेक ठराव गावकऱ्यांसमोर ग्रामसभेत मांडले. यावेळी पोपट मोतींगे यांनी तंटामुक्ती अध्यक्षपदी रफिक पटेल यांची निवड करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला त्यास नामदेव मोतींगे यांनी अनुमोदन दिले. त्यास गावकऱ्यांनी बिनविरोध पाठिंबा दिल्याने रफिक पटेल यांची तंटामुक्ती अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. यावेळी अनेक ग्रामस्थांची मोठया प्रमाणावर उपस्थिती होती.

**बनशेंद्रा हे ऐतिहाशिक गाव असून छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांच्या वतनदारी असलेले जहागीरीचे हे गाव आहे. या गावात सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविदाने राहतात, त्याचा प्रत्यय आज पुन्हा आला. मुस्लिमधर्मीय असलेले रफिक पटेल यांची गावकऱ्यांनी बिनविरोध एकमताने निवड केली असून रफिक पटेल हे प्रत्येक सामाजिक कामात हिरीरीने सहभाग घेत असतात. हिंदू/मुस्लिमांसह प्रत्येक जातीधार्मियांच्या धार्मिक सण, उत्सवात सहभाग घेतात. त्यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा हा सन्मान आहे.**

**शिवराम जंजाळ, माजी सरपंच**

## शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी बाप्पा आले

### राळेगावच्या न्यू बाल गणेश उत्सव मंडळाच्या देखाव्यातून सामाजिक संदेश

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** जिल्हा महाराष्ट्रमध्ये शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून सुपरिचित आहे. अशातच यावर्षी जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे राळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जवळपास 40 हजार हेक्टरवर शेतपिकांचे नुकसान झाले. घेतलेले बँकांचे व सावकाराचे कर्ज कसे फेडावे या विवंचनेत आत्महत्या करण्यासारखे पाऊल उचलू लागला. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये यासाठी शेतकऱ्यांची मुलेच पुढे आली असून आपल्या न्यू बाल गणेश उत्सव मंडळाच्या देखाव्यातून प्रत्यक्ष देवबाप्पा जमिनीवर येऊन शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करीत असल्याचा देखावा उभारला आहे. संकट आणि शेतकरी हे जरी समीकरण असले तरी संकटे येतात आणि जातात मात्र शेतकऱ्यांनी आपला धीर सोडू नये. यासाठी प्रत्यक्षात गणपती बाप्पा शेतकऱ्यांचे पाय पकडून गळफास वा आत्महत्या करू नये, देवबाप्पा आपल्या पाठीशी आहे ते मदतीला धावून आले आहे. असा समस्त शेतकऱ्यांना संदेश देण्यासाठी हा देखावा उभारण्यात आला आहे. या मंडळात केवळ 20 वर्षाआतील सर्व शेतकऱ्यांची मुले असून त्यांच्या सामाजिक आणि मानवतावादी संदेशातून भविष्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनेक अनुचित घटनेला निश्चितच आळा बसणार हे निश्चित.






आधुनिक केसरी

# भक्ती गणेश मंदिर, एन-१ सिडको

संकष्ट चतुर्थीचेच्या दिवसाचा आरंभ होतो आणि भक्ती नगरातील भक्ती गणेश मंदिरात घंटांचे निदान निदान घुमू लागतात. हजारो गणेश भक्तांची पावले मंदिराच्या दिशेने वळतात. चिखलठाणा, हर्सुल, हडको, सिडको परिसरातील हजारो भक्तगण एका आंतरिक भावभक्ती भावाने या भक्ती गणेश मंदिराच्या मध्ये दर्शनासाठी येतात आपल्या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी. अंतरमनात भावसुमनांची फुलमाला गुंफून तासात रांगेत हे भक्तगण उभे राहिलेल्या आपणास दिसतात. ते एका आत्मिक श्रद्धेमुळेच.



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

कमलाताई रानडे यांच्या मनात सिडको परिसरात गणेश मंदिराची स्थापना करण्याची इच्छा निर्माण झाली. 1982 मध्ये त्यांनी त्यावेळचे अध्यक्ष श्री यादवराव पाटील यांच्या जवळ इच्छा व्यक्त केली. तिला पाहता पाहता मूर्त स्वरूप आले. 1986 मध्ये करवीर पिठाचे जगद्गुरु शंकराचार्य भारती यांच्या हस्ते या मंदिरात गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

गणेश मूर्ती तीन फूट उंचीची आहे. मंदिराची उंची 80 फूट इतकी आहे. हे मंदिर पश्चिमा भिमुख आहे.



मंदिर बांधणारा माणूस मोठा बांधकाम तज्ञ नव्हता. एका साध्या गवंड्याने तेही एक हात असलेल्या गवंडी ज्याने एका हाताने त्यांनी ही भक्ती गणेश मंदिराची वास्तू बांधून दिली. यादवराव पाटील स्वतः कलावंत होते त्यामुळे त्यांनी पारंपारिक पद्धतीच्या शेंदूर वर्णीय मूर्तीची निवड केली नाही. ज्या मूर्तीस खास पौराणिक ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाच्या स्थान असेल अशा प्रकारची मूर्ती खास चेन्नईवरून तयार करून आणली. काळ्या पाषाणाची कोरीव मूर्ती आहे.

1986 मध्ये या परिसरातील नागरिक विशेषता महिला वर्गाने पुढाकार घेऊन 21000 रुपये जमा केले. त्यामधूनच पुढे मंदिराची उभारणी झाली.

भक्ती मंदिरात मंदिराचे पुजारी यांच्याकडून गणेशाची षोडोशोपचारे पुजा-अर्चा.. अभिषेक सहस्रावर्तने केली जातात. संकष्ट चतुर्थीस खूप मोठ्या संख्येने येणारे भक्तगण अभिषेक करत असतात. गणेशोत्सवाच्या कालावधीत मंदिराच्या बाजूस असलेल्या हॉलमध्ये उत्सवाच्या मूर्तीची स्थापना करण्यात येते. धार्मिक कार्यक्रमाबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमाचे त्यावेळी आयोजन केले जाते.

भविष्यात मंदिर समितीच्या वतीने गोरगरिबांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी खास मदत केली जाणार आहे. उत्तम गुण संपादन करणाऱ्या मुला मुलींचा या मंडळाच्या माध्यमातून सत्कार केला जातो. गरीब महिलांना मदतीसाठी विविध प्रकल्प राबवलेले आहेत, असे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

भक्ती गणेशानी आपल्या अलौकिक प्रेमाने भक्तांच्या हृदयामध्ये वेगळ्या असे स्थान निर्माण केलेले आहे. एक अनामिक ओढीतून या भक्ती गणेश मंदिराकडे सारे भक्तगण नियमाने येत असतात. पाहता पाहता संपूर्ण परिसरात हा भक्ती सागरात चतुर्थीच्या वेळे फुलून येतो तो याच भक्ती रसात. हाच भक्तीचा सुगंध मनात कायम हृदयात साठवून ठेवून ते भक्तगण आपल्या परमप्रिय गणेशाचं दर्शन कधी होईल याच भावनेने नेहमी येत असतात हे बाकी खर...



# अदिवासी नेत्यास बहिष्काराचे भाष्य करत केली जातिवाचक शिवीगाळ

## अरूण काळेंवर पाचव्यांदा अँट्रॉसिटी अँक्टनुसार गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील वडवाळी गावातील अदिवासी नेत्यास जातिवाचक शिवीगाळ करून सार्वजनिक बहिष्कार टाकण्याचे भाष्य करणाऱ्या अरूण काळेवर पाचव्यांदा अँट्रॉसिटी अँक्टनुसार पैठण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून अरूण काळे हा पसार झाला आहे तर पोलिसांची पथके त्याच्या मागावर गेली असल्याची माहिती पोलिस अधिकारी यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अदिवासी भिल्ल समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष अशोक बरडे हे तालुक्यातील वडवाळी गावात जय बालाजी चहाच्या हॉटेलवर सहकारी मित्रासोबत गप्पा करत उभे असताना अचानक शिवसेना शिंदे गटाचे खंदे समर्थक तथा माजी तालुका प्रमुख अरूण काळे हे तिथे आले व अशोक बरडेला म्हणाले, तु माझ्या विरोधात ग्रामपंचायतीला गुन्हा दाखल करण्याचे सांगितले होतेस तुम्ही भिलटे जास्त माजलेत तुला गावात राहू देणार नाही. आम्ही गावचे पाटील आहोत. आमचा गावात दबदबा आहे, तुमची गावाबाहेर राहणारी जात आहे, तुझे सर्व कुटूंब बहिष्कृत करीन व घर आणि मालमत्ता जाळून टाकीन. तुला गाव सोडून जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असे म्हणत हिन भावनेनी अपमान केल्याने अशोक बर्डे यांनी थेट पैठण पोलिस ठाणे गाठले व संबधित प्रकार पोलिसात सांगितला.

अरूण काळे यांचे गुन्हेगारी तक्ता पोलिसांनी काढला असता यापुर्वी त्यांच्यावर चार वेळा अँट्रॉसिटी अँक्टनुसार गुन्हा दाखल असल्याचे समोर आल्याने उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांनी अरूण काळेवर कलम ५०४, ५०६, ३(१) (r) ३(१)(s)३(१)(zc) ३(२ ) va अँट्रॉसिटी अँक्टनुसार पाचव्यांदा पैठण पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आली असून अरूण काळे यांच्या शोधात पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहूल हे करीत आहेत.

# ‘त्या’ शिक्षकाला निलंबित करा अन्यथा आमरण उपोषण; मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** येथील न.प. उर्दू प्रा. कन्या शाळा क्र. ३ चे सहाय्यक अध्यापक शमीम अहेमद तस्लीम हुसेन यांना निलंबित करण्यात यावे, अन्यथा १२ सप्टेंबरपासून न.प. कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा पालकांसह नागरिकांनी एका निवेदनाव्दारे न.प. मुख्याधिकारी यांना दिला आहे.

शमीम अहेमद तस्लीम हुसेन सहाय्यक अध्यापक न.प.उर्दु प्रा. कन्या शाळा क्र. ३ यांचेवर योग्य ती कार्यवाही करणेसाठी समाज माध्यमातून व वैयक्तीकरित्या अनेक तक्रारी आपल्या कार्यालयात दाखल केलेल्या आहे. परंतु आपल्या तक्रारींवर सदर कार्यालयाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसून आपले कार्यालयाकडून शमीम अहेमद तस्लीम हुसेन यांना अभय देण्यात येत आहे. शमीम अहेमद तस्लीम हुसेन या शिक्षकांने चारित्र्य हिनतेचे कृत्य केल्याबाबतचे अनेक सबळ पुरावे आपल्या कार्यालयास सादर केले आहे. शिक्षकी पेशाला अशोभनिय कृत्य करून हा शिक्षक स्वतः केलेल्या अशा कृत्याचा प्रसार करीत आहे. अशा शिक्षकांमुळे शाळेची बदनामी होत असून शाळेतील विद्यार्थ्यांवर त्यांच्या अशा कृत्यांचा वाईट प्रभाव पडत आहे. शाळेतील विद्यार्थी शिक्षकांचे आचरणातून शिकत असतात त्यामुळे अशोभनिय कृत्य करणाऱ्या या शिक्षकांवर योग्य ती कार्यवाही करावी. कारण या शिक्षकाने केलेल्या अशोभनिय कृत्याबाबत प्रसार माध्यमातून सुध्दा प्रसिध्द झाले आहे. यामुळे शिक्षकांची प्रतिमाही मलिन होत आहे.

त्यामुळे शमीम अहेमद तस्लीम हुसेन यांना लोणार येथून दुसरीकडे कोठेही बदली न करता त्यांना निलंबित करण्यात यावे. सदरची कार्यवाही १० सप्टेंबर २०२२ पर्यंत न केल्यास १२ सप्टेंबर २०२२ रोजी पालक व गावातील मंडळी न.प.कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असून होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार असेल यांची नोंद घ्यावी, असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदनावर पालक व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून निवेदनाची प्रतिलीपी ठाणेदार यांना सुध्दा देण्यात आली आहे.

# डॉ. देवकर यांना उत्कृष्ट संशोधक शिक्षक-2022 पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**घनसावंगी :** संत रामदास महाविद्यालय घनसावंगी जिल्हा जालना येथील भूगोल अभ्यासक प्रा.डॉ. भाऊसाहेब देवकर यांच्या संशोधन पेपर व पुस्तक प्रकाशन कार्यामुळे त्यांना ट्रुनोजोयो विद्यापीठ, मदुरा (इंडोनेशिया) आणि IDEI (इंडोनेशिया), आणि ग्लोबल रिसर्च फाऊंडेशन न्यू दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाइन GRF आंतरराष्ट्रीय पुरस्कार आणि सन्मान समारंभ गूगल मीट कार्यक्रमात उत्कृष्ट संशोधक शिक्षक पुरस्कार - 2022 (भूगोल विषय) प्रदान करण्यात आला.

ग्लोबल रिसर्च फाउंडेशन (GRF)- दिल्ली प्रस्तुत पुरस्कार 2022, श्रीमती विमला देवी एज्युकेशन सोसायटी (SUDES, दिल्ली, भारत)आणि ट्रुनोजोयो विद्यापीठ, मदुरा (इंडोनेशिया) आणि IDEI (इंडोनेशिया) आणि नोबल सायन्स प्रेस यांच्या सहकार्याने संशोधन, नवोपक्रम आणि शिक्षण पुरस्कारमध्ये विविध शैक्षणिक, संशोधन, सामाजिक क्षेत्र, कॉर्पोरेट आणि व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला पुरस्कार प्रदान करण्यात आले. दि. 4 सप्टेंबर 2022 रोजी शिक्षक दिनाच्या पूर्वी ऑनलाइन 7 वा GRF आंतरराष्ट्रीय पुरस्कार आणि सन्मान कार्यक्रम झाला. या मध्ये शैक्षणिक, व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रातील संशोधन, नवोपक्रम आणि शिक्षण पुरस्कार आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदान करण्यात आले.

या ऑनलाईन सत्रात प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून प्रा.डॉ. मुहम्मद अल्किरोम विल्डन, ट्रुनोजोयो विद्यापीठ, इंडोनेशिया (सरचिटणीस IDEI) तसेच विशेष निमंत्रित व प्रमुख पाहुणे डॉ. परवेझ हयात, झारखंडचे माजी पोलीस महासंचालक उपस्थित होते. तसेच हवामान बदल, आपत्ती आणि सुशासन या विषयावरील प्रसिद्ध वक्ते डॉ. मुहम्मद रिधुआन टोनी लिम अब्दुल्ला, पेट्रोनास युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी, मलेशिया हे सर्व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्लोबल रिसर्च फाऊंडेशन न्यू दिल्लीचे डॉ. एस. एम.अनस इक्बाल हे होते. या ऑनलाइन सत्रात सन्मान व पुरस्कार सत्राचे समन्वयक प्रा.यशश्री दुबे व प्रा.रॉबिन नीमा यांनी सहभागी झालेल्या मान्यवरांचा परिचय करून दिला. प्रस्तुत कार्यक्रमात अतिथींनी सर्व पुरस्कार विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

दुसऱ्या सत्रात - संस्थांना पुरस्कार आणि सन्मानांची घोषणा करण्यात आली. या सत्रात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. काय आमिनाता दिपोनेगोरो विद्यापीठ, इंडोनेशिया, मोकम्मद अली, ट्रुनोजोयो विद्यापीठ, इंडोनेशिया आणि सदस्य, IDEI, इंडोनेशिया, डॉ. समीर गोपालन, संचालक व्यवस्थापन, सिल्व्हर ओक विद्यापीठ, अहमदाबाद इत्यादी सहभागी झाले होते. यावेळी प्रा. यशश्री दुबे आणि प्रा. रॉबिन नीमा, कार्यक्रम समन्वयक यांनी सूत्रसंचालन केले व डॉ. कीर्ती अग्रवाल यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. हा पुरस्कार मिळाल्यामुळे संत रामदास महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.




# ज्ञानधारा विद्यालयात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज दि.५ रोजी धारेश्वर शिक्षण संस्था संचलित ज्ञानधारा प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय देवळाई परिसर औरंगाबाद या शाळेत डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण जयंती व शिक्षक दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त दीपक गांगवे यांनी माहिती दिली व चौथी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका पार पाडली. शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांसाठी विविध खेळाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास धारेश्वर शिक्षण संस्थेच्या सहसंचालिका रीना पाटील उपस्थित होत्या. तसेच विद्यालयाचे प्राचार्य महेश पाटील, पर्यवेक्षक तेजनकर व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहन म्हस्के यांनी केले व आभारप्रदर्शन रितेश प्रधान यांनी केले. तसेच मुख्याध्यापिकेची भूमिका कु.पूनम हिवाळे हिने पार पाडली.

# पुसदच्या मानाचा गणबादेवाला १२० वर्षाची परंपरा

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** पुष्पावती म्हणजेच पुसद शहरात कै. शेषराव पाटील यांच्या वाड्यासमोरचा व माळीपुऱ्यातील गणपती यांना फार जुनी परंपरा आहे. पुसदच्या उदासी वार्ड येथील गणबादेव गणेश उत्सव मंडळाची सन १९०३ रोजी दत्तराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झाली. पाटील यांच्या घराजवळ राहणाऱ्या नागरिकांकडून गजानन पंडितकर, यादवराव चौधरी यांनी वर्गणी गोळा करून गणपती बसविला होता. ती परंपरा आजही कायम आहे. पूर्वी पाटलाचा गणपती हा पालखीतून गावात फिरवून स्थापन केला जात होता. जुन्या परंपरेनुसार चालत आलेल्या गणपतीचे आकर्षण कायम असून, यंदा मंडळाला ११८ वर्षे पूर्ण झाले आहेत.

गणोबा देवाचीची ओळख कायम करणारे त्या वेळेचे मंडळाचे अध्यक्ष कै. शेषराव दत्ताराम पाटील यांच्या पुढाकाराने मुरलीधर पंडितकर, नरहरी पंडितकर, कोत्ता कोंडावार बंधू, गल्लीत राहणाऱ्या नागरिकांना भोजनाची व्यवस्था सुद्धा केली. १९८० पासून शरद शेषराव पाटील हे अध्यक्ष असून, २००५ मध्ये गणबादेव गणेश उत्सव मंडळ ट्रस्ट उदासी वार्ड नावाने नोंदणी झाली. ते आजही अध्यक्ष म्हणून कायम आहेत. ग्रामीण लोकनाट्य, दंडार, व्याख्यान, लोकनाट्य, पथनाट्य, पडद्यावर चित्रपटदेखील त्यावेळेस दाखवले जात. मधुकर केचे, देविदास सोटे यांच्यासह विदर्भातील नामवंत साहित्यिकांची व्याख्याने कवी संमेलन झाली आहेत. मंडळाचे उपाध्यक्ष ऋषिकेश पंडितकर, सचिव सुधाकर वाशिमकर, कोषाध्यक्ष सतीश पंडितकर हे १५ वर्षांपासून रोज महाप्रसादाचे आयोजन करतात. ताजनेकर बंधू या गणाबा देवाची मूर्ती बनवून देतात हे विशेष. लोकवर्गणीतून गोळा केलेला निधी दान केला जात होता. या गणोबा देवाच्याच्या दोन्ही वेळच्या आरतीस जुन्या पुसदची स्त्री, पुरुष मंडळी मोठया संख्येने हजेरी लावतात.



# संत तुकाराम विद्यालयात शिक्षक दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज





**गंगापूर :** तालुक्यातील शिंगी येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था वरुड संचलित संत तुकाराम विद्यालयात विद्यार्थ्यांनी भारताचे पूर्व राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने इयत्ता १० वी व १२ वीच्या मुलां-मुलींनी शाळेत प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य करून स्वयं-शासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापिका साक्षी नरोडे, उपमुख्याध्यापिका सना शेख, पर्यवेक्षक प्रमोद गवारे, गोपाळ टेमकर, सार्थक तिखे, पल्लवी साठे, कृष्णा खिल्लारे, दिशा संबळे, ईश्वरी शिंदे, कावेरी काकडे, ज्ञानेश्वरी सावंत, स्वाती संबळे, तंजुम शेख, आर्शेद शेख, सोयल सय्यद यांनी अध्यापन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे, शालेय समिती सदस्य रवींद्र जाधव, सुरेश चव्हाण, मंगल जाधव, कल्पना उरणकर, गजानन हरकळ, गोकुळ काकडे, संदीप सावंत, कैलास बनकर, हरिभाऊ चौधरी यांची उपस्थिती होती.

# अखेर लासूर स्टेशन येथील कांदा मार्केट झाले सुरु : रवींद्र पाटील पोळ

## दुपारपर्यंत कांद्याची 200 वाहनांची विक्रमी आवक; व्यापाऱ्यांनी शेतकरी व बाजार समितीची मागितली जाहीर माफी

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अख्त्यारितील कांदा मार्केट व्यापाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे त्यांनी अचानक कांद्याचा लिलाव बंद केले होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी मुंबई/नागपूर रास्ता रोको करून जोपर्यंत व्यापाऱ्यांचे लायसन्स रद्द होत नाही तोपर्यंत रस्त्यावरच ठिय्या मांडला होता. त्यामुळे तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याने शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र खांडेकर यांनी मध्यस्थी करत शेतकऱ्यांची बाजू ऐकून घेतली होती व बाजार समिती प्रशासन व शेतकऱ्यांचा समन्व्य घडून आणला.

त्यावेळी बाजार समितीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ व्यापाऱ्यांचे लायसन्स पंधरा दिवसांसाठी रद्द केले होते. त्यानंतर व्यापाऱ्यांचे व बाजार समितीच्या चर्चेचे गुऱ्हाळ बैठकावर बैठका




घेत चालू होते मात्र बाजार समिती ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती मात्र शिवसेनेचे उपजिल्हाध्यक्ष कृष्णा पाटील डोणगावकर यांनी

> **शेतकरी आमच्यासाठी प्रथम क्रमांकावर असल्याने सध्या शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन कांदा खरेदी लिलाव सोमवारपासून चालू करण्याचा निर्णय शेतकरी हितासाठी घेण्यात आला आहे. व्यापारी वर्गानेही शेतकऱ्यांची माफी मागितली व कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाचीही जाहीर माफी मागितल्याने अखेर आजपासून कांदा खरेदी पुर्वरत चालू झाली आहे.**
>
> **रवींद्र पोळ, सभापती**

मध्यस्थी केली व शेतकऱ्यांची अडवणूक होऊ नये व सध्या पिकांना खते व औषधांची गरज असल्याने शेतकऱ्यांना कांदा विक्रीसाठी पर्याय नव्हता. त्यामुळे अखेर शेतकऱ्यांची व बाजार समितीची व्यापाऱ्यांनी जाहीर माफी मागत कांदा लिलाव चालू करण्याची विनंती केली त्यामुळे बाजार समिती नरमली व आज अखेर कांदा मार्केटमध्ये कांदा खरेदीचा मार्ग मोकळा झाला.

# शिक्षणाचा वाटाडया विठ्ठलराव तिडके यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** धारुर तालुक्यातील शिक्षणाचा वाटाडया म्हणून ओळखले जाणारे निवृत्त नायब तहसिलदार विठठलराव तिडके यांचे दुःखद निधन झाले.

धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथील पोलीस पाटील आणि किर्तनकार रामभाउ तिडके महाराज व देवईबाई तिडके यांच्या पोटी विठठलराव तिडके यांचा जन्म झाला. अत्यंत गरीबीने गांजलेल्या कुटुंबात आई - वडीलांनी उपासमार सहन करीत आणि शेती विकून विठठलराव व त्यांच्या इतर भावंडाना शिकविले. भोगलवाडी गावातील पहिले मॅट्रीक पास होण्याचा मान विठठलरावाना मिळाला. लागलीच १९५९ मध्ये त्याना महसूल खात्यामध्ये कारकून म्हणून नौकरी मिळाली. पुढे गिरदावर व नायब तहसिलदार म्हणून त्यानी सेवा केली. पंचवीस वर्षापूर्वी ते सेवानिवृत झाल्यावर अंबाजोगाई येथे स्थायीक झाले.

विठठलराव तिडके यानी त्यांच्या इतर भावडांना सोबत घेवून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांचे शिक्षण पूर्ण केले. या कामी



त्यांची धर्मपत्नी कौशल्याबाई तिडके यांची मोलाची साथ मिळाली. त्यांच्या परिवारात दोन शिक्षक, दोन वकील, एक सरकारी वकील, पाच डॉक्टर, सहा इंजिनियर, एक न्यायाधीश आणि संशोधनामध्ये जगात प्रथम पारीतोषिक मिळविणारे वैभव तिडके हे शास्त्रज्ञ असे सुशिक्षित सदस्य आहेत. भोगलवाडीमध्ये इतर मुलांना शिकण्यासाठी प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करण्याचे महान कार्य रामभाउ तिडके महाराज आणि विठठलराव तिडके यांनी केले. त्यामुळे भोगलवाडीमध्ये क्लास वन व क्लास टू अधिकारी, डॉक्टर, वकील, शिक्षक, पोलीस, सैनिक, पदवीधर असे शेकडोजण विविध पदावर आहेत. शिक्षणक्षेत्रात बीड जिल्हयात भोगलवाडीचा डंका वाजत आहे. याची मुहूर्तमेड रोवण्याचे आणि शिक्षणाचा वाटाडया म्हणून रामभाउ तिडके आणि विठठलराव तिडके यांनी अव्दितीय कार्य केले आहे. विठठलराव तिडके यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अंबाजोगाई येथे वृध्दापकाळाने ३१ ऑगस्ट रोजी निधन झाले.

# लासूर स्टेशनला आ. प्रशांत बंब यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत केले शिक्षकांच्या घरी जाऊन गुरुपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**लासूर स्टेशन :** आज ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त गंगापूर खुलताबादचे आ. प्रशांत बंब यांनी केलेल्या आवाहनानुसार गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्यालयी राहणाऱ्या शिक्षकांचा त्यांच्या घरी जावून त्यांचा सपत्नीक सन्मान व पूजन करण्यात आले. मुख्यालयी राहणाऱ्या शिक्षकांच्या थेट घरी जाऊन लासूर स्टेशन येथील सरपंच मीनाताई पांडव, ग्रामपंचायत सदस्य व पालकांनी शिक्षकांचा सपत्नीक सत्कार करून शाल, श्रीफळ देऊन गुरुपूजन केले. यावेळी सत्कार झालेल्या शिक्षकांनी आमदार बंब व लासूर स्टेशन येथील सरपंच वं ग्रामपंचायत सदस्यांनी यांचे आभार मानले.

दरम्यान यावेळी लासुर स्टेशनच्या सरपंच मीनाताई पांडव, माजी उपसरपंच गणेश व्यवहारे, संजय पांडव, बाजार समितीचे संचालक सोपान, ग्रामपंचायत सदस्य राजूभाऊ गायकवाड, कल्याण पवार, प्रकाश कोकरे, अशोक सौदागर, विकी मढीकर, भगवान गाढे, भाजपचे जिल्हाउपाध्यक्ष अमोल पाटील जाधव, विनोद जाधव, दत्तू पाटील कऱ्हाळे, राहुल साबळे, ग्रामपंचायत कर्मचारी दादासाहेब भागवत, जालिंदर पवार आदिंसह पालक उपस्थित होते. दरम्यान आ. प्रशांत बंब हे देखील गंगापूर मतदार संघातील रांजणगाव, वाळूज, शेंदुरवादा, जामगाव आदी ठिकाणी भेट देत असून जेवढे गावे शक्य होतील तेवढ्या गावात जाऊन मुख्यालयी राहणाऱ्या शिक्षक मंडळींचा सपत्नीक पूजन करून सत्कार करत आहे.

# मृत शेतकऱ्याच्या पत्नीला आमदारांनी बंद पाकिटात दिले दोन हजार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** पक्षाने आयोजित केलेल्या दहीहंडीत भाजपा नेते नाचत असतानाच तालुक्यात एका त्रस्त शेतकऱ्याने आत्महत्या केली. पण भाजपा नेत्यांना तिकडे फिरकण्यास वेळ नव्हता. याबाबत सर्वस्तरातून रोष व्यक्त झाल्यावर दोन दिवसांनी शुक्रवारी उमरखेड विधानसभेचे भाजपा आमदार नामदेव ससाणे संबंधित शेतकऱ्याच्या घरी धडकले. पण स्वतःच्या स्वभावाचे दर्शन घडवित त्यांनी शेतकऱ्याच्या पत्नीला बंद पाकिटातून आर्थिक मदत दिली. त्या पाकिटात होते करकरीत दोन हजार रुपये! घरचा कर्ता पुरुष गमावलेल्या, शेतीचा आधार गमावलेल्या आणि अवघी शेतीच उद्ध्वस्त झालेल्या त्या महिलेला ही आमदारांकडून आलेली दोन हजारांची मदत म्हणजे जखमेवरची खपली काढणारी दुःखद नोट ठरली. पण सध्याच्या राजकारणाचे हेच 'चलन' असल्याची खंत व्यक्त करीत ती माऊली गप्प राहिली.

या घटनेची गावात खबर लागताच आ. ससाणे यांच्या 'दातृत्वा'चा गावकऱ्यांनी चांगलाच समाचार घेतला. मदत



**चंपत जंगले**
**मृत शेतकरी**




**आ. नामदेव**
**ससाणे**

द्यायचीच होती, तर सरकारकडून संपूर्ण शेती सावरण्यासाठी आमदारांनी प्रयत्न करायला हवे होते. दोन हजार रुपये तेही बंद लिफाफ्यात देऊन त्यांनी स्वत :च्या कर्मदरिद्रीपणाच्या प्रदर्शनासह आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या जखमा ताज्या करण्याचे काम केले. अशा संतप्त प्रतिक्रिया आता गावकऱ्यांतून उमटत आहेत. काही दिवसांपूर्वी जन्माष्टमीनिमित्त उमरखेड शहरात जिल्ह्यातील सर्वात मोठ्या दहीहांडी उत्सत्वाचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा प्रदेशाध्यक्षासह दोन माजी मंत्री, आमदार व जिल्ह्यातील भाजपा नेते या उत्सवात तल्लीन होऊन नाचले. हा सोहळा सुरू असतानाच तालुक्यातील निंगनूर (हिरामणनगर) येथील चंपत नारायण जंगले या ४० वर्षीय शेतकऱ्याने अतिवृष्टी व महापुराने पीक उद्ध्वस्त झाल्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. त्यावेळी उमरखेडमध्ये असलेले भाजपा प्रदेशाध्यक्ष किंवा अन्य नेत्यांना निंगनूरमध्ये जाण्याची बुद्धी सुचली नाही. समाजातून रोष व्यक्त झाल्यानंतर शनिवारी आ. नामदेव ससाणे आत्महत्याग्रस्त कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी गावात पोहोचले. त्यांच्यासोबत नायब तहसीलदार सुभाष पाईकराव, मंडळ अधिकारी सचिन फटाले आले. यावेळी आमदार नामदेव ससाणे यांनी मृतकाच्या पत्नीला बंद लिफाल्यात दोन हजार रुपये देऊन त्यांची क्रूर थट्टा केली. याबाबत गावकरी संताप व्यक्त करीत आहेत.

**क्रूर थट्टा..! बंद लिफाफा देऊन पुराव्यासाठी काढले फोटो!**

घरातील कर्ता पुरुष गमावल्याने शेतीसह संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झालेल्यांना शासनाकडून भरीव मदत मिळवून देण्यापेक्षा दोन हजार रुपये देऊन आमदारांनी त्या कुटुंबियांसोबत फोटोही काढले. केवळ फोटोसेशन करण्यासाठी आ. नामदेव ससाणे यांनी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची क्रूर थट्टा केली असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला. आमदारांच्या या कृतीचा निंगणूर परिसरातून निषेध व्यक्त केला जात आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - २

आधुनिक केसरी

१. काही तरी नावीन्य आणि रोमांचक आठवणी राहतील आशा गोष्टी कराव्यात.

उदा. आठवडाभर निवांत समुद्रकिनारी छान अशा ओल्या वाळूतून चालणे, सायकल किंवा बाईकवरुन जंगलाची सफर करणे इ. एकदा का बाहेर पडलं की आपोआपच तुमच्या मेंदूत वेगवेगळे सेक्स हार्मोन्स इनडॉरफिन तयार होऊन आपोआप मूड क्रिएट होतो म्हणूनच काही नवीन कुतुहल निर्माण होईल अशा गोष्टी कराव्यात.

२. इनर्स सुद्धा वेगवेगळ्या डीझाईन्स आणि कलरफुल असाव्यात. त्यामुळे एक नवीन अ‍ॅट्रॅक्शन आणि सौदर्य आणि रोमांचक असा अनुभव येतो. (उघड्या भागापेक्षा झाकलेल्या भागातून दिसणाऱ्या गोष्टींचे कुतुहल आणि अ‍ॅट्रॅक्शन जास्त असते.)

३. डान्स-डान्स - एखाद्या चांगल्या अशा रिसॉर्टमधील पॉप म्युझिक किंवा संगीत रजनीच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्या. तिथे जोडीने डान्स करा ज्यामुळे भावना उद्दीपित होऊन अधिक जवळीक निर्माण होते आणि रात्रीच्या उत्साहामध्ये त्याचा परिणाम अधिक उत्कटतेने जाणवतो. काही कारणामुळे तिथे उपस्थित लोकांमध्ये कम्फर्ट वाटत नसेल तर समवर जाऊनहीं तुम्ही हा डान्स करु शकता.

४. संगीत ऐकणे किंवा वाजवणे - संगीतामुळे एकांतात मूड होण्यास खूप चांगली मदत होते. पुरातन काळात भगवान श्रीकृष्ण ज्याप्रमाणे बासरी वाजवून वातावरणात एक वेगळाच उत्साहू तयार करीत असत, तसच याकाळात संगीत, गाणं, वाहता झरा, झुळ झुळ पाण्याचा आवाज यामुळे एक वेगळीच वातावरण निर्मिती होते. आपल्या आवडीच्या गाण्यांचा आस्वाद घेत मग ते प्रेमगीत असोत, गाण्याच्या भेंड्या खेळणे असो किंवा आवडीची गाणी स्वतःम्हणणे असो यामुळे एक वेगळेच संवेदनशील असे वातावरण तयार होत जाते.

५. उत्तेजनात्मक वाचन किंवा श्रवण करणे – कामसूत्र किंवा तत्सम मासिके किंवा पुस्तकं यांचं एकत्रित वाचन किंवा एकमेकाला वाचून दाखवणे, किंवा तशा पद्धतीच्या फिल्मस किंवा ऑडिओज ऐकणे याचाही एक वेगळा प्रभाव कामजीवनावर दिसून येतो. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अ‍ॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# लोहरा शेताशिवारात आढळला अनोळखी मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुक्यातील खंडाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लोहरा इजारा शेत शिवारातील बंधाऱ्यामध्ये एका अनोळखी इसमाचा (अंदाजे ४० वय) असलेल्या मृतदेह आढळला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मृत इसमाचे नाव अद्याप स्पष्ट झाले नाही पोलिस त्याचा शोध घेत आहेत. ही घटना दि.४ सप्टेंबर २०२२ रोजी रात्रीच्या ११:०० वाजल्याच्या सुमारास उघडकीस आली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.

खंडाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लोहरा इजारा येथील शेत शिवारातील बंधाऱ्यांमध्ये शेतकऱ्यांना एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला, याची खबर पोलिसांना लगेच दिली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून मृतदेह पाण्यातून बाहेर काढून पंचनामा करण्यात आला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा शासकीय रुग्णालय पुसद येथे पाठविण्यात आला परंतु पोलिसांना अनोळखी ईसम पाण्यात पडून मयत झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. पण तो अनोळखी मृतदेह बाहेर काढून त्याची आजू बाजूस चौकशी केली पण तपास लागला नव्हता. मृतदेहाची अद्याप ओळख पटली नसून हा मृतदेह कोणाचा आहे इथे कसा आला याचा तपास खंडाळा पोलीस करीत आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in